दादा भगवान कथित

# सेवा-परोपकार



आपली फळे दुसऱ्यांना द्याल तर निसर्ग आपले सर्वच सांभाळून घेईल.

Marathi

दादा भगवान कथित

# सेवा-परोपकार

मूळ गुजराती संकलन : डॉ. नीरूबहन अमीन

अनुवाद : महात्मागण

**प्रकाशक** : अजीत सी. पटेल
दादा भगवान विज्ञान फाउंडेशन
1, वरूण अपार्टमेंट, 37, श्रीमाळी सोसायटी,
नवरंगपुरा पुलिस स्टेशनच्या समोर,
नवरंगपुरा, अहमदाबाद - 380009,
Gujarat, India.
**फोन :** +91 79 3500 2100

© Dada Bhagwan Foundation,
5, Mamta Park Society, B\h. Navgujarat College,
Usmanpura, Ahmedabad - 380014, Gujarat, India.
**Email :** info@dadabhagwan.org
**Tel :** + 91 79 3500 2100

**All Rights Reserved. No part of this publication may be shared, copied, translated or reproduced in any form (including electronic storage or audio recording) without written permission from the holder of the copyright. This publication is licensed for your personal use only.**

**प्रथम आवृत्ति** : 3000, ऑक्टोबर, 2016

**भाव मूल्य** : 'परम विनय' आणि
'मी काहीच जाणत नाही', हा भाव!

**द्रव्य मूल्य** : 10 रुपये

**मुद्रक** : अंबा मल्टीप्रिंट
B-99, इलेक्ट्रॉनिक्स GIDC,
क-6 रोड, सेक्टर-25,
गांधीनगर-382044.
Gujarat, India.
**फोन :** +91 79 3500 2142

**ISBN/eISBN** : 978-93-86321-04-6

Printed in India

# त्रिमंत्र





नमो अरिहंताणं
नमो सिद्धाणं
नमो आयरियाणं
नमो उवज्झायाणं
नमो लोए सव्वसाहूणं
एसो पंच नमुक्कारो
सव्व पावप्पणासणो
मंगलाणं च सव्वेसिं
पढमं हवइ मंगलं ॥ १ ॥
ॐ नमो भगवते वासुदेवाय ॥ २ ॥
ॐ नमः शिवाय ॥ ३ ॥
जय सच्चिदानंद





# दादा भगवान कोण?

जून १९५८ संध्याकाळची अंदाजे सहाची वेळ, सुरत स्टेशनवर अलोट गर्दी होती. रेल्वेच्या प्लेटफॉर्म नंबर तीनच्या बाकावर बसलेल्या श्री अंबालाल मूळजीभाई पटेल रूपी देहमंदिरात नैसर्गिक स्वरूपात कित्येक जन्मांपासून व्यक्त होण्यासाठी आतूर असलेले 'दादा भगवान' संपूर्णपणे प्रकट झाले आणि निसर्गाने सर्जन केले अध्यात्माचे अद्‌भुत आश्चर्य! एका तासात विश्वदर्शन लाभले! मी कोण? भगवंत कोण? जग कोण चालवत आहे? कर्म म्हणजे काय? मुक्ती कशाला म्हणतात? इत्यादी जगातील सर्व आध्यात्मिक प्रश्नांची रहस्ये संपूर्णपणे प्रकट झाली. अशाप्रकारे निसर्गाने विश्वाला प्रदान केले एक अद्वितीय, संपूर्ण दर्शन आणि ह्याचे माध्यम बनले अंबालाल मूळजीभाई पटेल, जे होते गुजरातच्या चरोतर जिल्ह्यातील भादरण गावचे पाटील, कॉन्ट्रॅक्टचा व्यवसाय करणारे आणि तरीही पूर्ण वीतराग पुरुष.

त्यांना प्राप्ती झाली तशी ते फक्त दोन तासात इतर मुमुक्षूंनां सुद्धा आत्मज्ञानाची प्राप्ती करवित असत, त्यांच्या सिद्ध झालेल्या अद्‌भुत ज्ञान प्रयोगाद्वारे. त्याला अक्रम (क्रमविरहीत) मार्ग म्हटले जाते. अक्रम म्हणजे क्रमाशिवायचा आणि क्रम म्हणजे पायरी पायरीने, क्रमाक्रमाने वर चढणे! अक्रम म्हणजे लिफ्ट मार्ग! शॉर्ट कट!

ते स्वत: प्रत्येकाला 'दादा भगवान कोण?' याबद्दलची फोड करून देताना म्हणायचे की, ''हे दिसतात ते 'दादा भगवान' नाहीत. हे तर 'ए.एम. पटेल' आहेत. आम्ही ज्ञानी पुरुष आहोत आणि आत प्रकट झाले ते दादा भगवान आहेत. दादा भगवान तर 'चौदालोक'चे नाथ आहेत, ते तुमच्यात पण आहेत, सर्वांमध्ये आहेत! तुमच्यात अव्यक्त रुपात आहेत आणि 'येथे' माझ्या आत संपूर्णपणे व्यक्त झालेले आहेत! माझ्या आत प्रकट झालेले 'दादा भगवान' यांना मी पण नमस्कार करतो.''

व्यापारात धर्म असावा परंतु धर्मात व्यापार नसावा. या सिद्धांताने त्यांनी आपले संपूर्ण जीवन व्यतीत केले. संपूर्ण जीवनात त्यांनी कधीही, कोणाकडूनही पैसे घेतले नाहीत, उलट स्वत:च्या व्यवसायातून झालेल्या फायद्यातून भक्तांना यात्रा करवित असत.

# निवेदन

ज्ञानी पुरुष संपूज्य दादा भगवान यांच्या श्रीमुखातून अध्यात्म आणि व्यवहारज्ञानासंबंधित जी वाणी निघाली, तिला रेकॉर्ड करून संकलन व संपादन करून पुस्तकाच्या रूपाने प्रकाशित केले जात आहे. विभिन्न विषयांवर निघालेल्या सरस्वतीचे अद्भुत संकलन ह्या पुस्तकात झाले आहे, जे नवीन वाचकांसाठी वरदान रूप सिद्ध होईल.

प्रस्तुत अनुवादामध्ये असे विशेष ध्यान ठेवलेले आहे की प्रत्येक वाचकाला दादाश्रींची प्रत्यक्ष वाणीच ऐकली जात आहे असा अनुभव व्हावा. याच कारणाने कदाचित काही ठिकाणी अनुवादाची वाक्य रचना मराठी व्याकरणानुसार त्रुटीपूर्ण जाणवेल, परंतु तिथे जर आशय समजून वाचण्यात आले तर अधिक लाभदायी होईल.

प्रस्तुत पुस्तकात काही ठिकाणी कंसात दर्शविलेले शब्द किंवा वाक्य दादाश्रींद्वारा बोलल्या गेलेल्या वाक्यांना अधिक स्पष्टतापूर्वक समजावण्यासाठी लिहिले गेले आहेत. तसेच काही ठिकाणी इंग्रजी शब्दांना मराठी अर्थाच्या रूपात ठेवले गेले आहेत. दादाश्रींच्या श्रीमुखातून निघालेले काही शब्द जसेच्या तसेच *इटालिक्स* मध्ये ठेवलेले आहेत, कारण त्या शब्दांसाठी मराठी भाषेत असे शब्द नाहीत की जे त्याचा पूर्ण अर्थ देऊ शकतील. तरी पण त्या शब्दांचे समानर्थी शब्द कंसात तसेच पुस्तकाच्या शेवटी पण दिले गेले आहेत.

ज्ञानींच्या वाणीला मराठी भाषेत यथार्थ रूपाने अनुवादित करण्याचा प्रयत्न केला आहे. परंतु दादाश्रींच्या आत्मज्ञानाचा आशय जसा आहे तसा तर आपल्याला गुजराती भाषेतच अवगत होईल. ज्यांना ज्ञानाचा गहन अर्थ समजून घ्यायचा असेल, ज्ञानाचे खरे मर्म समजायचे असेल त्यांनी ह्या हेतूने गुजराती भाषा शिकावी असा आमचा अनुरोध आहे. अनुवादासंबंधी उणीवांबद्दल आपले क्षमा प्रार्थी आहोत.

# संपादकीय

आपले मन-वचन-काया दुसऱ्यांच्या सुखासाठी वापरले तर आपल्या स्वतःच्या जीवनात कधीच सुखाची कमतरता भासणार नाही. आणि स्वतःचे सेल्फ रियलाइजेशन (आत्मसाक्षात्कार) करून घेतले तर त्याला सनातन सुखाची प्राप्ती होईल. मनुष्य जीवनाचे ध्येय हे एवढेच आहे. या ध्येयाच्या मार्गाने चालायला लागलो तर मनुष्याला जीवनमुक्त दशेचा अनुभव येईल. त्यानंतर मग या जीवनात प्राप्त करण्यासारखे काहीच उरत नाही.

आंब्याचे झाड स्वतःचे किती आंबे खात असेल? त्याची फळे, लाकूड, फांद्या सर्व काही दुसऱ्यांसाठीच उपयोगी असते ना? त्याचे फळस्वरूप त्याला उर्ध्वगती प्राप्त होत राहते. धर्माची सुरुवात ऑब्लाइजिंग नेचर (परोपकारी स्वभाव) पासून होते. दुसऱ्याला काहीही द्याल तेव्हापासूनच स्वतःचा आनंद सुरू होतो.

परम पूज्य दादाश्री एकाच वाक्यात म्हणतात की, जी मुले आपल्या आई-वडिलांची सेवा करतात त्यांना कधीच पैशांची कमतरता भासणार नाही, आणि जे आवश्यक आहे ते सर्व त्यांना मिळत जाईल. आणि आत्मसाक्षात्कारी गुरुची सेवा केल्याने मोक्ष प्राप्त करतो.

दादाश्रींनी स्वतःच्या आयुष्याचे एकच ध्येय ठेवले होते की, मला जो भेटेल त्याला सुख मिळायलाच हवे. स्वतःच्या सुखाचा विचार त्यांनी कधीच केला नाही. समोरच्या व्यक्तीची काय अडचण आहे आणि ती कोणत्याप्रकारे दूर करता येईल, या भावनेतच ते निरंतर राहिले. तेव्हाच त्यांना कारुण्यता आणि अद्‌भुत अध्यात्म विज्ञान प्रकट झाले.

प्रस्तुत संकलनामध्ये दादाश्री सर्व दृष्टिकोनातून जीवनाचे ध्येय कशा प्रकारे सिद्ध करावे की जे सेवा-परोपकारासहित असेल, त्याची समज सरळ-अचूक दृष्टांताद्वारे फिट करून देतात. जे जीवनात ध्येय रूपाने आत्मसात केले तर मनुष्य जीवन सार्थक झाले असे म्हणता येईल.

**- डॉ. नीरूबहन अमीन**

# सेवा-परोपकार

## मनुष्य जन्माचे वैशिष्ट्य

**प्रश्नकर्ता :** हा मनुष्य जन्म व्यर्थ न जावो यासाठी काय करावे?

**दादाश्री :** 'हा मनुष्य जन्म व्यर्थ न जावा' असेच संपूर्ण दिवस चिंतन केले तर ते सफल होईल. या मनुष्य जन्माची चिंता केली पाहिजे. त्याऐवजी लोक लक्ष्मीची (पैशांची) चिंता करतात. प्रयत्न करणे हे तुमच्या हातात नाही, परंतु भाव करणे हे तुमच्या हातात आहे. प्रयत्न करणे हे दुसऱ्याच्या सत्तेत आहे. भावाचे फळ येते. खरे पाहिले तर भावसुद्धा परसत्ताच आहे, पण भाव केला तर त्याचे फळ येतेच.

**प्रश्नकर्ता :** मनुष्य जन्माचे वैशिष्ट्य काय आहे?

**दादाश्री :** मनुष्य जीवन परोपकारासाठी आहे आणि हिंदुस्तानातील माणसांचे जीवन 'ॲब्सॉल्यूटिजम'साठी आहे, मुक्तीसाठी आहे. हिंदुस्तानाशिवाय बाहेर अन्य देशांमधील जे जीवन आहे ते परोपकारासाठी आहे. परोपकार म्हणजे मनाचा वापर दुसऱ्यांसाठी करणे, वाणीचा वापर सुद्धा दुसऱ्यांसाठी करणे आणि वर्तनही दुसऱ्यांसाठीच करणे. मन-वचन-कायेने परोपकार करा. तेव्हा तुम्ही म्हणाल, 'मग माझे काय होईल' मी परोपकार केला तर माझ्या घरात काय राहील?

**प्रश्नकर्ता :** लाभ तर मिळेलच ना?

**दादाश्री :** हो, पण लोक तर हेच मानतात ना की मी दिले तर माझे कमी होईल.

**प्रश्नकर्ता :** खालच्या वर्गाची माणसे असतील तेच असे मानतील.

**दादाश्री :** उच्च वर्गाचा माणूस असे मानतो की परक्यांना दिले जाऊ शकते.

## जीवन परोपकारासाठी

याचे गुह्य सायन्स असे आहे की जर मन-वचन-काया परोपकारासाठी वापरले तर तुमच्याजवळ सर्व गोष्टी असतील. परोपकारासाठी वापर करा. आणि जर फी घेऊन वापर केला तर?

**प्रश्नकर्ता :** त्रास होईल.

**दादाश्री :** कोर्टात फी घेतात. शंभर रुपये लागतील, दीडशे रुपये लागतील, तेव्हा म्हणेल, 'साहेब, दीडशे घ्या.' परंतु इथे परोपकाराचा कायदा तर लागू होत नाही ना!

**प्रश्नकर्ता :** पोटात आग लागली असेल तर असे म्हणावेच लागते ना?

**दादाश्री :** असा विचार करूच नका. कोणत्याही प्रकारचा परोपकार कराल ना, तर तुम्हाला कोणतीही अडचण येणार नाही. आता लोकांचे काय होते? तर ते अर्धवट समजून करायला जातात त्यामुळे उलटाच 'इफेक्ट' (परिणाम) होतो. म्हणून मग त्यांची श्रद्धा बसतच नाही, उडून जाते. आजपासून परोपकार करायला सुरुवात कराल दोन-तीन जन्मानंतर सर्व काही नीट होईल, हेच 'सायन्स' आहे.

## चांगल्या-वाईटासाठी, परोपकार एकसारखाच

**प्रश्नकर्ता :** मनुष्य भले करण्यासाठी परोपकारी जीवन जगतो. लोकांना सांगतो देखील, परंतु तो जो भल्यासाठी सांगतो त्याला लोक 'हा माझ्या भल्यासाठीच सांगत आहे,' हे समजून घ्यायला तयारच नसतात, त्याचे काय?

**दादाश्री :** असे आहे, परोपकार करणारा समोरच्याची समज किती आहे हे पाहत नाही. परोपकार करणाऱ्याने जर समोरच्याची समज पाहिली तर ती वकीली म्हटली जाईल. यामुळे समोरच्याची समज किती आहे हे पाहायचेच नसते.

ही झाडे आहेत ना सगळी आंबा, निंब या सगळ्या झाडांवर फळे येतात. तर आंब्याचे झाड स्वत:चे किती आंबे खात असेल?

**प्रश्नकर्ता :** एक सुद्धा नाही.

**दादाश्री :** मग ती कोणासाठी आहेत?

**प्रश्नकर्ता :** दुसऱ्यांसाठी.

**दादाश्री :** हो, तेव्हा ते झाड असे बघते का की हा लबाड आहे की चांगला आहे? जो घेऊन जाईल त्याची फळे, माझी नाहीत. झाडे तर परोपकारी जीवन जगतात. असे जीवन जगताना त्या जीवांची हळूहळू उर्ध्वगती होते.

**प्रश्नकर्ता :** पण अनेकदा असे होते की ज्याच्यावर उपकार केले जातात ती व्यक्ती उपकार करणाऱ्यावरच दोषारोपण करताना दिसते.

**दादाश्री :** हो, तेच तर बघायचे आहे ना? जो उपकार करतो त्याच्यावर सुद्धा अपकार करतो.

**प्रश्नकर्ता :** समज नसल्यामुळे!

**दादाश्री :** ही समज तो कुठून आणणार? समज असेल तर कामच झाले ना... पण अशी समज आणणार कुठून?

परोपकार तर फारच उच्च स्थिती आहे. परोपकारी जीवन हेच साऱ्या मनुष्य जीवनाचे ध्येय आहे.

## आयुष्यात महत्त्वाची कार्ये ही दोनच

आणि या हिंदुस्तानात मनुष्याचा जन्म आणखी कशासाठी आहे? स्वत:चे हे कायमस्वरूपी बंधन तुटावे या हेतूसाठी आहे, 'ॲब्सोल्यूट' होण्यासाठी आहे आणि जर तुला 'ॲब्सोल्यूट' होण्याचे ज्ञान प्राप्त झाले नाही तर तू दुसऱ्यांसाठी जगायला शिक. ही दोनच कार्ये करण्यासाठी हिंदुस्तानात जन्म आहे. ही दोन कार्ये लोक करतात का? लोकांनी तर भेसळ करून मनुष्यातून जनावरात जाण्याची कला शोधून काढली आहे.

## सरळपणाचे उपाय

**प्रश्नकर्ता :** जीवन सात्विक आणि सरळ बनविण्यासाठी कोणते उपाय आहेत?

**दादाश्री :** तुझ्याजवळ जे आहे ते ऑब्लाइजिंग नेचर (परोपकारी स्वभाव) कायम ठेवून इतरांना देत जाशील तर आपोआपच जीवन सात्विक बनत जाईल. ऑब्लाइजिंग नेचर केले आहेस का तू? तुला ऑब्लाइजिंग नेचर आवडते का?

**प्रश्नकर्ता :** काही प्रमाणात केलेले आहे.

**दादाश्री :** ते जास्त प्रमाणात करशील तर जास्त फायदा मिळेल. परोपकार करतच राहावे. कोणाला काही हवे असेल तर आणून द्यावे, पैसे द्यावे, कोणी दु:खी असेल तर त्याला दोन कपडे शिवून द्यावे, याप्रकारे परोपकार करत रहावे.

भगवंत म्हणतात की, मन-वचन-काया आणि आत्म्याचा (प्रतिष्ठित आत्म्याचा) उपयोग दुसऱ्यांसाठी कर आणि मग जर तुला काही दु:ख आलेच तर मला सांग.

धर्माची सुरुवातच 'ऑब्लाइजिंग नेचर'ने होते. तुम्ही तुमच्याकडचे असलेले दुसऱ्यांना द्याल त्यातच आनंद आहे. आणि लोक तर घ्यायचे

शिकतात! तुम्ही तुमच्यासाठी काहीच करू नका. लोकांसाठीच करत राहा, मग स्वत:साठी काहीच करावे लागणार नाही.

## भावात तर शंभर टक्के

कोणतेही झाड स्वत:ची फळे खाते का? नाही. म्हणजे ही झाडे मनुष्याला उपदेश देतात की तुम्ही तुमची फळे इतरांना द्या. तुम्हाला निसर्ग देईल. निंब कडू लागला तरी लोक निंब लावतातच कारण त्याचे इतरही लाभ आहेत, नाही तर रोपटे उपटूनच टाकले असते. परंतु ते दुसऱ्या प्रकारे लाभदायी आहे. ते गारवा देते, त्याचे औषध हितकारी आहे, त्याचा रस हितकारी आहे. सत्‌युगात लोक समोरच्या व्यक्तीला आनंद देण्याचाच प्रयत्न करायचे. संपूर्ण दिवस 'कोणाला ऑब्लाइज करावे' याचेच विचार त्यांना येत असत.

बाहेरून कमी प्रमाणात झाले तरी हरकत नाही पण आतून आपला भाव तर असाच पाहिजे की, माझ्याजवळ पैसे आहेत तर मी इतरांची दु:खे कमी करायला हवीत. माझ्याजवळ अक्कल असेल तर, अकलेने कोणाची समजूत काढून त्याचे दु:ख कमी करायचे आहे. स्वत:जवळ जी शिल्लक असेल त्यातून मदत करणे, किंवा ऑब्लाइजिंग नेचर तरी ठेवायलाच हवे. ऑब्लाइजिंग नेचर म्हणजे काय? तर दुसऱ्यांना मदत करण्याचा स्वभाव.

ऑब्लाइजिंग नेचर असेल तर स्वभावही तितकाच चांगला असतो. फक्त पैसे देणे म्हणजे ऑब्लाइजिंग नेचर असे नाही. पैसे तर आपल्याजवळ असतील किंवा नसतीलही परंतु आपली भावना, आपली इच्छा अशीच असायला हवी की कोणाला कशा प्रकारे मदत करू? आपल्या घरी कोणी आले असेल तर त्याला कशी मदत करता येईल अशीच भावना असायला पाहिजे. पैसे देणे किंवा न देणे हे तुमच्या शक्तीनुसार आहे.

केवळ पैशांनीच ऑब्लाइज करता येते असे नाही. ते तर देणाऱ्याच्या

शक्तीवर अवलंबून असते. फक्त मनापासून भावना असायला हवी की कशा प्रकारे 'ऑब्लाइज' करता येईल. हीच भावना सतत कशी राहील एवढेच बघायचे आहे.

## जीवनाचे ध्येय

असे काही पाहिजे की जे आपल्याला आपल्या ध्येयापर्यंत पोहोचवेल. ध्येयशून्य जीवनाला काहीच अर्थ नाही. डॉलर्स (पैसा) येतात, खाऊन–पिऊन मजा करतात आणि दिवसभर चिंता–वरीज् (काळजी) करत राहतात, याला जीवनाचे ध्येय कसे म्हटले जाईल? मनुष्यपण मिळाले, ते व्यर्थ घालवण्यात काय अर्थ आहे? मनुष्य जीवन मिळाल्यानंतर आपल्या ध्येयापर्यंत पोहोचण्यासाठी काय करायला हवे? सांसारिक सुख पाहिजे असेल, भौतिक सुख पाहिजे असेल तर तुमच्याजवळ जे काही असेल ते इतरांना द्या. कोणत्याही प्रकारे लोकांना सुख दिले तर तुम्ही सुखाची अपेक्षा करू शकता, नाही तर तुम्हाला सुख मिळणार नाही, आणि जर दु:ख दिले तर तुम्हाला दु:खच मिळेल.

या जगाचा नियम एकाच वाक्यात समजून घ्या. या जगातील सर्व धर्मांचे सार हेच आहे की जर मनुष्याला सुख हवे असेल तर इतर जीवांना सुख द्या आणि दु:ख हवे असेल तर दु:ख द्या. तुम्हाला जे अनुकूल असेल ते द्या. आता कोणी म्हणेल की, आम्ही लोकांना सुख कसे देऊ शकतो? आमच्याजवळ तर पैसे नाहीत. तेव्हा पैशांनीच मदत केली जाते असे काही नाही. त्यांच्यासोबत ऑब्लाइजिंग नेचर ठेवू शकता. त्यांना पाहिजे ते आणून देऊ शकता, सल्ला देऊ शकता, अशा अनेक प्रकारे तुम्ही ऑब्लाइज करू शकता.

देवाच्या मूर्तीजवळ बसून राहणे याला धर्म म्हणत नाहीत. धर्म म्हणजे आपल्या ध्येयापर्यंत पोहोचणे. त्याचबरोबर एकाग्रतेसाठी आपण काही साधना करू ती वेगळी गोष्ट आहे. याच्यात जर एकाग्रता केली

तर सर्व एकाग्रच आहे. ऑब्लाइझिंग नेचर ठेवा. नक्की करा की आता मला इतरांना ऑब्लाइज करायचेच आहे तर तुमच्यात परिवर्तन होईल. नक्की करा की मला वाइल्डनेस (जंगलीपणा) करायचा नाही.

समोरचा जंगली झाला तरी मला जंगली व्हायचे नाही, तर मग असे होऊ शकते, नाही का? असा निश्चय केला तर थोडे थोडे परिवर्तन होईल की नाही?

**प्रश्नकर्ता :** अवघड आहे पण...

**दादाश्री :** नाही, अवघड आहे तरी पण नक्की करा. कारण तुम्ही मनुष्य आहात आणि भारत देशाचे मनुष्य आहात. असे तसे थोडेच आहात? ऋषीमुनींचे पुत्र आहात तुम्ही. भरपूर प्रकारच्या शक्ती आहेत तुमच्याकडे ज्या झाकल्या गेल्या आहेत, त्या तुम्हाला कशा उपयोगी पडतील? जर तुम्ही माझ्या सांगण्याप्रमाणे निश्चय कराल की मला हे करायचेच आहे तर त्याचे फळ निश्चितच मिळेल. कुठपर्यंत असा जंगलीपणा करत राहणार? आणि त्यात तुम्हाला सुख कधीच मिळणार नाही. जंगलीपणामुळे सुख मिळते का?

**प्रश्नकर्ता :** नाही.

**दादाश्री :** उलट दु:खालाच आमंत्रण देता.

## परोपकारासोबत पुण्य

जोपर्यंत मोक्ष मिळत नाही तोपर्यंत फक्त पुण्यच मित्रासारखे काम करते आणि पाप शत्रूसारखे काम करते. आता तुम्हाला शत्रू ठेवायचा आहे की मित्र ठेवायचा आहे, तुम्हाला जसे आवडेल त्याप्रमाणे नक्की करा. मित्राचा संयोग कसा होईल ते विचारून घ्या आणि शत्रूचा संयोग कसा जाईल ते ही विचारा. जर तुम्हाला शत्रू पसंत असेल तर त्याचा संयोग कसा प्राप्त होईल हे जर तुम्ही विचारले तर आम्ही तुम्हाला सांगू

की वाटेल ते करा, हवे तर कर्ज काढून सुद्धा तूप खा, वाटेल तिथे भटका आणि तुम्हाला आवडेल ती मौज करा. मग पुढची गोष्ट पुढे. आणि पुण्यरुपी मित्र हवा असेल तर आम्ही सांगू की, या झाडांपासून शिका. कोणतेही झाड स्वत:चे फळ खाते का? कोणतेही गुलाबाचे रोपटे स्वत:चे फूल खात असेल का? थोडेसे तरी खात असेल, नाही का? आपण नसताना रात्री खात असेल, नाही? नाही ना खात?

**प्रश्नकर्ता :** नाही खात.

**दादाश्री :** ही झाडे-पाने तर फळ देण्यासाठी माणसांच्या सेवेत आहेत. यात झाडांना काय मिळते? त्यांची उर्ध्वगती होते आणि माणूस त्यांची मदत घेऊन पुढे जातात. असे माना की आपण आंबा खाल्ला त्यात आंब्याच्या झाडाचे काय गेले आणि आपल्याला काय मिळाले? आपण आंबा खाल्ला म्हणून आपल्याला आनंद झाला. त्यामुळे आपली वृत्ती बदलली आणि त्यामुळे आपण शंभर रुपयांइतके अध्यात्मात कमावले. आता आंबा खाल्ला म्हणून त्यातून पाच टक्के आंब्याच्या झाडाला आपल्या वाट्यातून जातात आणि पंच्याण्णव टक्के आपल्या वाट्याला येतात. ती झाडे आपल्या वाट्यातून पाच टक्के घेतात आणि बिचारे उच्च गतीला जातात आणि आपलीही अधोगती होत नाही तर आपण सुद्धा पुढे जातो. म्हणूनच ही झाडे सांगतात की आमच्या सर्व गोष्टींचा उपयोग करा. प्रत्येक प्रकारच्या फळा-फुलांचा वापर करा.

## योग उपयोग परोपकाराय

हा संसार आपल्याला साजेसा असेल, संसार जर आपल्याला आवडत असेल, संसारी चीज वस्तूंची इच्छा असेल, संसारी विषयांची कामना असेल तर इतके करा की 'योग उपयोग परोपकाराय'. योग म्हणजे मन-वचन-कायेचा योग आणि उपयोग म्हणजे बुद्धीचा, मनाचा, चित्ताचा उपयोग. या सर्वांचा उपयोग इतरांसाठी करायचा आणि इतरांसाठी उपयोग केला नाही तर शेवटी आपले लोक घरच्यांसाठी तर करतातच

ना! या कुत्रीला खायला का मिळते? या पिल्लांच्या आत भगवंत आहेत. त्या पिल्लांची ती सेवा करते म्हणून तिला सर्व मिळत आहे. याच आधारावर सर्व जग चालत आहे. या झाडाला आहार कुठून मिळतो? या झाडांनी काही पुरुषार्थ केला आहे का? ते तर जरा सुद्धा इमोशनल होत नाहीत. ते कधी इमोशनल (भावनिक) होतात का? ते तर कधी मागे-पुढेही होत नाहीत. त्यांना कधीच असे वाटत नाही की इथून एका मैलावर विश्वामित्री नदी आहे तर तिथे जाऊन पाणी पिऊन येऊ!

प्रामाणिकता आणि परस्पर 'ऑब्लाइजिंग नेचर.' बस एवढेच गरजेचे आहे. एकमेकांवर उपकार करणे हीच मनुष्य जीवनाची मोठी उपलब्धी आहे. या जगात दोन प्रकारच्या लोकांची चिंता मिटते. एक म्हणजे ज्ञानी पुरुषांची आणि दुसरे परोपकारी व्यक्तींची.

## परोपकाराची खरी पद्धत

**प्रश्नकर्ता :** या जगात चांगले कार्य कोणते म्हटले जाईल? त्याची व्याख्या काय, हे सांगता येईल का?

**दादाश्री :** हो. चांगले कार्य तर ही सर्व झाडे करत आहेत, ती अगदी उत्तम कार्य करत आहेत परंतु ते स्वत: कर्ताभावात नाहीत. ही झाडे जिवंत आहेत. सर्व झाडे आपली फळे दुसऱ्यांनाच देतात. तुम्ही तुमचे फळ दुसऱ्यांना देऊन टाका, तुम्हाला तुमचे फळ मिळत राहील. तुमची जी फळे उत्पन्न होतात-शारीरिक फळ, मानसिक फळ, वाचिक फळ, ती सर्व 'फ्री ऑफ कॉस्ट' इतरांना देत राहिलात तर तुम्हाला तुमची प्रत्येक आवश्यक वस्तू मिळत जाईल. तुमच्या जीवनावश्यक गरजांमध्ये किंचितमात्र अडचण येणार नाही आणि जर ती फळे तुम्ही स्वत:च खाऊन टाकली तर मात्र अडचणी येतील. समजा आंब्याच्या झाडाने स्वत:ची फळे स्वत:च खाल्ली तर त्याचा जो कोणी मालक असेल तो काय करील? त्या झाडाला कापूनच टाकील ना? त्याचप्रमाणे ही माणसे स्वत:ची फळे स्वत:च खातात, इतकेच नाही तर वरून फीसुद्धा मागतात!

एक अर्ज लिहून देण्याचे बावीस रुपये मागतात. ज्या देशात फ्री ऑफ कॉस्ट (मोफत) वकीली केली जायची. अहो, स्वतःच्या घरी खाऊ घालून वकीली करायचे तिथे ही दशा झाली आहे. गावात जर भांडणे झाली तर गावातील नगरप्रमुख त्या भांडणाऱ्या दोघांना बोलवायचा. 'चंदुलाल, तुम्ही आज साडे दहा वाजता माझ्या घरी या आणि नगीनदास तुम्ही पण त्याचवेळी घरी या.' नगीनदासच्या जागी कोणी मजूर किंवा शेतकरी असेल की जे भांडत असतील तर त्यांना सुद्धा घरी बोलवत. दोघांना बसवून सामोपचाराने त्यांच्यातील भांडणे मिटवत. ज्याचे पैसे फेडायचे असतील त्याला थोडे रोख मिळवून देऊन बाकीचे हप्ते लावून देत आणि मग दोघांना म्हणत की, 'चला, माझ्याबरोबर जेवायला बसा.' दोघांना खाऊ घालून घरी पाठवत असत. आज आहेत का असे वकील? म्हणून समजून घ्या आणि वेळेनुसार वागा आणि जर स्वतःचे स्वतःसाठीच वापरले तर मृत्यूसमयी दुःखी व्हाल. जीव निघत नाही आणि बंगला–गाडी सोडून जाऊ शकत नाही!

सल्ल्याचे पैसे त्यांच्याकडून मागत नव्हते. सहमतीने, असे तसे करून भांडण मिटवले जात होते. स्वतःकडील दोन हजार काढून देत असत आणि आता मात्र सल्ला घ्यायला गेलो की सल्ल्याची फी शंभर रुपये घेतात. अरे, 'जैन आहात ना तुम्ही?' तेव्हा म्हणतात, 'जैन तर आहोत पण आम्ही व्यवसाय करायला हवा की नको?' 'साहेब सल्ल्याची सुद्धा फी?' आणि तुम्ही जैन? देवालाही लाजवलेत? वीतरागांनाही लाजवलेत? *नो–हाऊ* ची फी? याला कसला घोळ म्हणायचा?

**प्रश्नकर्ता :** ही अतिरिक्त बुद्धीची फी असेच म्हणता येईल ना?

**दादाश्री :** बुद्धीचा विरोध नाही. ही बुद्धी, विपरीत बुद्धी आहे. स्वतःचेच नुकसान करणारी बुद्धी आहे. विपरीत बुद्धी! भगवंतांनी बुद्धीला विरोध केलेला नाही. भगवंत म्हणतात की, सम्यक् बुद्धी सुद्धा असू शकते. ती बुद्धी वाढली तर मनात चांगले विचार येतात की मी कोणाला

समाधान देऊ, कोणाला मदत करू, नोकरी नाही त्यांना नोकरी मिळेल असे काही करू.

## ऑब्लाइजिंग नेचर

**प्रश्नकर्ता :** आता माझ्या दृष्टीने मी सांगतो की, एखादा कुत्रा आहे तो एखाद्या कबुतराला मारायला आला आणि आपण त्याला वाचवायला गेलो तर माझ्या दृष्टीने आपण ऑब्लाइज केले तर मग आपण 'व्यवस्थित शक्ती'च्या मार्गात आलो ना?

**दादाश्री :** परंतु ते ऑब्लाइज केव्हा होईल? जर त्याचे 'व्यवस्थित' असेल तरच आपल्याकडून होईल, नाही तर होणारच नाही. आपण ऑब्लाइजिंग नेचर (परोपकारी स्वभाव) ठेवावा. त्याने सर्व पुण्यच बांधले जाईल म्हणजे मग दु:ख उत्पन्न होण्याचे साधनच उरणार नाही. पैशांद्वारे करता आले नाही तर त्याचे काम करून देऊन किंवा बुद्धीद्वारे योग्य समज देऊन, जमेल त्या मार्गाने ऑब्लाइज करावे.

## परोपकार, परिणाम लाभदायीच

हे जीवन जर परोपकारासाठी जगाल, तर तुम्हाला कोणतीही कमतरता राहणार नाही. कोणत्याही प्रकारची अडचण तुम्हाला येणार नाही. तुमच्या ज्या ज्या इच्छा असतील त्या सर्व पूर्ण होतील आणि नुसत्या उड्या माराल तर एकही इच्छा पूर्ण होणार नाही. कारण अशाने तर तुम्हाला झोपच येणार नाही. या शेठ लोकांना तर झोप येतच नाही. तीन-तीन, चार-चार दिवस झोपूच शकत नाहीत, कारण ज्याची त्याची लुटमारच केलेली आहे त्यांनी.

म्हणून ऑब्लाइजिंग नेचर असेल तर रस्त्याने जाता-जाता शेजारी-पाजारी कोणाला विचारून घ्यावे की भाऊ, मी पोस्ट ऑफिसात जात आहे. आपले काही पत्र टाकायचे आहे का? असे विचारत जाण्यात काही हरकत आहे? कोणी म्हणेल माझा तुझ्यावर विश्वास नाही. तेव्हा

म्हणावे, भाऊ, मी तुमच्या पाया पडतो. पण ज्यांचा तुमच्यावर विश्वास असेल त्यांची तरी पत्रे घेऊन जा.

ऑब्लाइजिंग नेचर हा तर माझ्या लहानपणापासूनचा गुण होता ते मी सांगतो, आणि पंचवीस वर्षाचा झालो तेव्हा माझे सर्व मित्र मला सुपर ह्यूमन म्हणायचे.

ह्यूमन (माणूस) कोणाला म्हणतात तर जो देतो आणि घेतो, समान भावाने व्यवहार करतो. ज्याने सुख दिले असेल त्याला सुख देतो, दु:ख दिले असेल त्याला दु:ख देत नाही, असा व्यवहार जो करतो तो मनुष्य म्हटला जातो.

म्हणजे जो समोरच्याचे सुख हिरावून घेतो तो पाशवी वृत्तीचा असतो. जो स्वत: सुख देतो आणि सुख घेतो असा मानवीय व्यवहार करतो म्हणून तो मनुष्यात राहतो आणि जो स्वत:चे सुख दुसऱ्यांना उपभोगण्यासाठी देतो तो देवगतीत जातो, तो सुपर ह्यूमन! स्वत:चे सुख दुसऱ्यांना, एखाद्या दु:खी माणसाला देतो तो देवगतीत जातो.

## त्यात इगोइजम नॉर्मल

**प्रश्नकर्ता :** परोपकाराबरोबर 'इगोइजम'ची (अहंकाराची)संगत असते का?

**दादाश्री :** जो परोपकार करतो त्याचा 'इगोइजम' नेहमी नॉर्मलच असतो. त्याचा 'इगोइजम' वास्तविक असतो आणि जो कोर्टात दीडशे रुपये फी घेऊन इतरांचे काम करतो त्याचा 'इगोइजम' खूप वाढलेला असतो.

या निसर्गाचा नियम काय आहे की तुम्ही तुमची फळे दुसऱ्यांना दिली तर निसर्ग तुम्हाला देईल, हेच गूढ सायन्स आहे. हा परोक्ष धर्म आहे. त्यानंतर प्रत्यक्ष धर्म येतो आणि शेवटी आत्मधर्म येतो. मनुष्य जीवनाचा हिशोब एवढाच असतो. सार एवढेच की मन-वचन-काया इतरांसाठी उपयोगात आणा.

## नवीन ध्येय आजचे, रिॲक्शन मागचे

**प्रश्नकर्ता :** तर मग परोपकारासाठीच जगले पाहिजे?

**दादाश्री :** हो, परोपकारासाठीच जगले पाहिजे. पण आता तुम्ही ही लाइन लगेच बदलली तर तसे केल्याने मागील रिॲक्शनस् येतात म्हणून मग तुम्ही कंटाळता आणि वाटते की हे तर मला अजूनही सहन करावे लागत आहे! पण काही काळापुरतेच तुम्हाला सहन करावे लागेल. त्यानंतर मात्र तुम्हाला कोणतेही दुःख राहणार नाही. ही तर आता तुम्ही नवीन लाइन बांधत आहात म्हणून मागील रिॲक्शनस् तर येतीलच ना! आजपर्यंत जे उलटे कार्य केले होते त्याचे फळ तर येईलच ना?

## शेवटी उपकार स्वतःवरच करायचे

कोणावर तरी उपकार केले असतील, कोणाचा फायदा केला असेल, कोणासाठी जगले असाल तर त्याचा लाभ तुम्हाला होतोच. पण तो भौतिक लाभ होतो आणि त्याचे फळ भौतिक स्वरूपातच मिळते.

**प्रश्नकर्ता :** कोणावर उपकार करण्यापेक्षा स्वतःवरच उपकार केले तर?

**दादाश्री :** बस, स्वतःवर उपकार करण्यासाठीच सर्व करायचे आहे. जो स्वतःवर उपकार करेल त्याचे कल्याण होईल. परंतु त्यासाठी स्वतःला (स्वतःच्या आत्म्याला) जाणून घ्यावे लागेल, तोपर्यंत इतरांवर उपकार करत राहायचे, त्याचे भौतिक फळ मिळत राहील. आपल्याला स्वतःची ओळख होण्यासाठी 'मी कोण आहे' हे जाणून घ्यावे लागेल. वास्तविक आपण स्वतः शुद्धात्मा आहोत. तुम्ही तर आजपर्यंत 'मी चंदुभाऊ आहे' (चंदुभाऊच्या जागी वाचकाने स्वतःचे नाव समजावे) एवढेच जाणत आहात ना, की अजून दुसरे काही जाणता? हा 'चंदुभाऊ तो मीच आहे,' असेच म्हणता ना? हिचा नवरा आहे, याचा मामा

आहे, याचा काका आहे, असे अनेक लागेबांधे! असेच आहे ना? हेच ज्ञान आहे ना तुमच्याकडे? त्याहून पुढे गेला नाहीत ना?

## मानवसेवा, सामाजिक धर्म

**प्रश्नकर्ता :** पण व्यवहारात असे होते की कोणासाठी दयाभाव राहतो, सेवा राहते, कोणासाठी भावना राहते की काहीतरी करावे, कोणाला तरी नोकरी मिळवून द्यावी, आजारी व्यक्तीला हॉस्पिटलमध्ये भरती करावे, या सर्व क्रिया म्हणजे एकप्रकारे व्यवहार धर्मच झाला ना?

**दादाश्री :** ही सर्व सामान्य कर्तव्ये आहेत.

**प्रश्नकर्ता :** तर मानवसेवा ही एकप्रकारे व्यावहारिकच आहे असेच समजायचे ना? हा तर व्यवहारधर्म झाला ना?

**दादाश्री :** हा व्यवहार धर्म पण नाही. हा तर समाजधर्म म्हटला जातो. ज्या समाजाला जे अनुकूल असेल ते त्या लोकांना अनुकूल वाटते आणि तीच सेवा जर दुसऱ्या समाजाला द्यायला गेलात तर त्यांना ते प्रतिकूल वाटते. म्हणून व्यवहार धर्म केव्हा म्हटला जातो की जो सर्वांनाच एकसारखा वाटतो तेव्हाच! आजपर्यंत तुम्ही जे केले ती समाजसेवा आहे. प्रत्येकाची समाजसेवा वेगवेगळी असते. प्रत्येक समाज वेगळा, तशीच सेवासुद्धा वेगळी.

## लोकसेवा बिगिन्स फ्रॉम होम

**प्रश्नकर्ता :** जी माणसे लोकसेवेत आलीत ती कशामुळे?

**दादाश्री :** त्यांची भावना चांगली असते. लोकांचे कशा प्रकारे भले होईल, अशीच त्यांची इच्छा असते. त्यांची भावना उत्तम आहे म्हणूनच ना!

लोकांसाठी भावना–मनोभाव की लोकांना कोणतेही दु:ख होऊ नये, अशी उच्च भावना आहे त्यामागे. परंतु लोकसेवकांचे मी बघितले

आहे की सेवकांच्या घरी जाऊन विचारले तर त्यांच्या नावाने घरचे सर्व बोंबा मारत असतात. घराकडे त्यांचे लक्ष नसते म्हणून ती सेवा म्हटली जात नाही. सेवेची सुरुवात घरापासून झाली पाहिजे. सेवा 'बिगिन्स फ्रॉम होम.' नंतर शेजारी, मग पुढची सेवा. इथे तर घरची माणसे त्यांच्याबद्दल तक्रार करत असतात. काय वाटते तुम्हाला? म्हणून सुरुवात घरापासून झाली पाहिजे ना?

**प्रश्नकर्ता :** हे भाऊ म्हणतात की, यांच्या बाबतीत घरात कोणाची तक्रार नाही.

**दादाश्री :** याचा अर्थ असा झाला की ती खरी सेवा आहे.

## करा जनसेवा, शुद्ध भावनेने

**प्रश्नकर्ता :** लोकसेवा करता करता त्यांच्यात भगवंताचे दर्शन करत सेवा केली तर त्याचे फळ यथार्थ येईल ना?

**दादाश्री :** भगवंताचे दर्शन झाले मग तर तो सेवेत पडणारच नाही. कारण एकदा भगवंताचे दर्शन झाल्यावर भगवंताला कोण सोडेल? लोकसेवा एवढ्यासाठी करायची की भगवंत सापडतील.लोकसेवा हृदयापासून व्हायला हवी. हृदयापासून असेल तर सर्वत्र पोहोचेल. लोकसेवा आणि प्रसिद्धी, दोन्ही एकत्र आले तर त्याला अडचण येईल. प्रसिद्धीशिवाय लोकसेवा असेल तर ती खरी म्हणायची. प्रसिद्धी तर मिळेलच, परंतु प्रसिद्धीची अपेक्षा नसावी, असे असायला हवे.

लोक जनसेवा करतील असे नाहीत. इथे तर आतमध्ये कीर्तीची अपेक्षा आहे, मानाची अपेक्षा आहे, वेगवेगळे लोभ आहेत ते त्यांच्याकडून करवून घेतात. जनसेवा करणारे लोक तर कसे असतात? ते अपरिग्रही पुरुष असतात. हे तर सगळे नाव कमावण्यासाठी आहेत. 'हळूहळू कधी तरी मंत्री बनू' या अपेक्षेने जनसेवा करतात. दानत वाईट आहे म्हणून बाहेरच्या अडचणी, व्यर्थ परिग्रह हे सर्व बंद केले तर सर्व काही ठीक

होईल. येथे तर एका बाजूने परिग्रही, संपूर्ण परिग्रही राहायचे आणि दुसऱ्या बाजूने जनसेवा करायची, हे दोन्ही कसे शक्य आहे?

**प्रश्नकर्ता :** सध्या तर मी मानवसेवा करत आहे. घरोघरी भिक्षा मागून मी गरिबांना देतो. सध्या मी एवढे करतो.

**दादाश्री :** ते सर्व तुमच्या वहीखात्यात जमा होईल. तुम्ही जे देता ना... नाही, नाही, तुम्ही जे त्या दोघांमध्ये करता त्याची रक्कम काढली जाईल. अकरा पटीने रक्कम करून मग त्याची जी दलाली आहे ती तुम्हाला मिळेल. पुढच्या जन्मी दलाली मिळेल आणि त्यामुळे तुम्हाला शांती राहील. हे चांगले काम करता म्हणून आज शांती राहते आणि भविष्यातही राहील, हे काम चांगले आहे.

बाकी, सेवा तर त्यास म्हणावी की तू काम करत असशील पण मला ते माहीत सुद्धा पडणार नाही, त्याला सेवा म्हणतात, मूक सेवा. इतरांना कळते ती सेवा म्हटली जात नाही.

सुरतमधील एका गावात आम्ही गेलो होतो. एक माणूस म्हणाला, 'मला समाजसेवा करायची आहे.' मी विचारले, 'तू कोणती समाजसेवा करणार?' तेव्हा तो म्हणाला, 'श्रीमंत लोकांकडून पैसे आणून गरीब लोकांमध्ये वाटतो.' मी विचारले, 'वाटल्यानंतर तपास करतो की ते पैसे कसे खर्च होतात?' त्यावर तो म्हणाला, 'ते आपल्याला बघण्याची काय गरज आहे?' नंतर त्याला समजावले की, 'भाऊ, मी तुला मार्ग दाखवतो त्याप्रमाणे कर. श्रीमंत लोकांकडून पैसे आणतोस त्यातून त्याला शंभर रुपयांची हातगाडी घेऊन दे. हातगाडी असते ना, दोन चाकांची. ती शंभर-दीडशे किंवा दोनशेची गाडी घेऊन दे आणि पन्नास रुपये आणखी दे, आणि सांग की, 'तू भाज्या घेऊन त्या विकून रोज संध्याकाळी मला माझी मूळ रक्कम परत देत जा. फायदा तुझा आणि हातगाडीचे एवढे पैसे रोजचे मला देत जा.' तेव्हा तो म्हणाला, 'खूप चांगले वाटले. तुम्ही परत सुरतला याल तोपर्यंत पन्नास-शंभर लोकांना मी एकत्र करीन.'

म्हणजे असे काही करा ना आता, हातगाड्या वगैरे आणून द्या या गरीब लोकांना, त्यांना काय मोठा व्यवसाय करण्याची गरज आहे का? एक गाडी तेवढी घेऊन द्याल तर संध्याकाळपर्यंत वीस रुपये कमावतील. तुम्हाला काय वाटते? त्यांना असे काही दिले तर आम्ही पक्के जैन आहोत की नाही? असे आहे की अगरबत्ती सुद्धा जळता जळता सुगंध देत जळते, नाही का? पूर्ण खोली सुगंधाने भरून जाते ना? मग काय आपल्यामुळे सुगंध पसरणार नाही?

आपण असे का असावे? मी तर वयाच्या पंचवीस-तिसाव्या वर्षी खूप अहंकार करत होतो आणि तो सुद्धा विचित्र प्रकारचा अहंकार करत होतो. एखादी व्यक्ती मला भेटली आणि त्या व्यक्तीला माझ्याकडून काही फायदा झाला नाही तर माझे भेटणे व्यर्थ असायचे. म्हणून प्रत्येक व्यक्तीला माझ्याकडून लाभ प्राप्त झाला होता. मी भेटलो आणि त्याचा जर फायदा झाला नाही तर माझे भेटणे काय कामाचे? आंब्याचे झाड काय म्हणते की तू मला भेटलास आणि आंब्यांचा मोसम आहे आणि जर तुला लाभ झाला नाही तर मी आंबाच नाही. मग जरी छोटा तर छोटा आंबा, तुला ठीक वाटेल तसा, पण तुला त्याचा लाभ तर होणार ना! आंब्याचे झाड स्वतः कोणताही फायदा घेत नाही. म्हणजे असे काही विचार तर आले पाहिजेत ना? हे मनुष्य जीवन कसे असावे, हे जर त्यांना समजावले तर तसे ते सर्व समंजसच आहेत. हे सर्व त्याला नीट समजले आणि त्याने तसे केले, मग चालू झाली गाडी. काय वाटते तुम्हाला?

**प्रश्नकर्ता :** हो, तुम्ही सांगत आहात तशी महाजनाची संस्था प्रत्येक ठिकाणी असायची.

**दादाश्री :** पण आता ते सुद्धा अडचणीत पडले आहेत! पण यात कोणाचा दोष नाही. जे झाले ते झाले, पण आता अशा विचारांनी सुधारलो तर अजूनही सुधारू शकतो आणि बिघडलेल्याला सुधारणे त्याचेच नाव

धर्म. सुधारलेल्याला सुधारण्यास तर सर्वच तयार असतात, पण बिघडलेल्याला सुधारणे याचेच नाव धर्म.

## मानवसेवा ही प्रभूसेवा

**प्रश्नकर्ता :** मानवसेवा ही तर प्रभूसेवा आहे ना?

**दादाश्री :** नाही, प्रभूसेवा नाही. दुसऱ्यांची सेवा केव्हा करतो? तर जेव्हा स्वतःला आतून दुःख वाटते तेव्हा. तुम्हाला एखाद्याची दया येते, त्याची स्थिती बघून तुम्हाला दुःख होते आणि ते दुःख दूर करण्यासाठी तुम्ही सेवा करता. म्हणजेच हे सर्व आपले दुःख संपवण्यासाठीच आहे. एका माणसाला खूप दया येते, तो म्हणतो, 'मला या लोकांबद्दल दया वाटल्याने त्यांना मी हे दिले, ते दिले...' नाही, अरे, तू तुझे दुःख दूर करण्यासाठी या लोकांना देतोस. तुला समजले का हे माझे म्हणणे? खूप सूक्ष्म आहे ही गोष्ट. स्थूल गोष्ट नाही ही. स्वतःचे दुःख दूर करण्यासाठी देत आहे. पण ही चांगली गोष्ट आहे. तुम्ही कोणाला द्याल तर तुम्हाला पुन्हा प्राप्त होईल.

**प्रश्नकर्ता :** पण जनता जनार्दनाची सेवा हीच भगवंत सेवा आहे की मग अमूर्ताला मूर्त रूप देऊन पूजा करणे ही आहे?

**दादाश्री :** जनता जनार्दनाची सेवा केल्याने आपल्याला संसारातील सर्व सुखे मिळतात, भौतिक सुखे आणि हळूहळू स्टेप बाय स्टेप मोक्षमार्गाकडे जातो. परंतु प्रत्येक जन्मात असे होत नाही. क्वचितच एखाद्या जन्मी असे संयोग जुळून येतात. प्रत्येक जन्मात असे घडत नाही, म्हणून ते सिद्धांतरूप नाही.

## ...कल्याणाच्या श्रेणीच भिन्न

समाज कल्याण करणे म्हणजे जगत कल्याण केले असे म्हटले जात नाही. हा तर एक सांसारिक भाव आहे. हे सर्व समाज कल्याण

म्हटले जाते. ते ज्याच्याकडून जेवढे होईल तेवढे करतात. ही सर्व स्थूल भाषा म्हटली जाते आणि जगत कल्याण करणे ती सूक्ष्म भाषा, सूक्ष्मतर आणि सूक्ष्मतम भाषा आहे. फक्त असे सूक्ष्मतम भावच असतात किंवा मग त्याचे थेंबच असतात.

## समाजसेवा प्रकृती स्वभाव

समाजसेवेची ज्याला धुंदी चढलेली आहे, ध्यास लागला आहे, म्हणून तो घरात जास्त लक्ष देत नाही आणि बाहेरच्या लोकांची सेवा करण्यातच तो गुंतलेला असतो, ती समाजसेवा म्हटली जाते. आणि इतर सर्व तर स्वत:चे आंतरिक भाव म्हटले जातात. असे भाव स्वत:ला येतच राहतात. कोणासाठी दया येते, कोणासाठी भावना होते आणि असे सगळे स्वत:च्या प्रकृतीत घेऊनच आलेला असतो. पण तरीही शेवटी हा प्रकृती धर्मच आहे. समाजसेवा हा सुद्धा प्रकृती धर्म आहे, याला प्रकृती स्वभाव म्हणतात की याचा स्वभाव असा आहे, त्याचा स्वभाव असा आहे. कोणाचा दु:ख देण्याचा स्वभाव असतो तर कोणाचा सुख देण्याचा स्वभाव असतो, हे दोन्ही प्रकृती स्वभाव आहेत, आत्मस्वभाव नाही. प्रकृतीमध्ये जसा माल भरलेला आहे तसा त्याचा माल निघत असतो.

## सेवा-कुसेवा, प्राकृत स्वभाव

तुम्ही जी सेवा करता तो प्रकृती स्वभाव आहे आणि एखादा मनुष्य जी कुसेवा करतो तो सुद्धा प्रकृती स्वभावच आहे. यात तुमचाही पुरुषार्थ नाही आणि त्याचाही पुरुषार्थ नाही, पण तो मनात असे मानतो की, 'मी करत आहे.' आता 'मी करत आहे' हीच भ्रांती आहे. येथे 'आत्मज्ञान' दिल्यानंतरही तुम्ही सेवा तर करणारच आहात कारण प्रकृतीच तशी घेऊन आला आहात, पण ती सेवा शुद्ध सेवा होईल. आता शुभ सेवा होत आहे. शुभ सेवा म्हणजे बंधन असलेली सेवा. सोन्याची बेडी देखील बंधनच आहे ना? आत्मज्ञानानंतर समोरच्या व्यक्तीला काहीही

झाले तरी तुम्हाला दुःख होत नाही, आणि त्याचे दुःख दूर होते, मग तुम्हाला करुणा राहील. आता तर तुम्हाला दया येते की बिचाऱ्याला किती दुःख होत असेल? किती दुःख होत असेल? त्याची तुम्हाला दया येते. दया नेहमी आपल्याला दुःख देते. जिथे दया आहे तिथे अहंकार असतोच. दयाभावाशिवाय प्रकृती सेवा करतच नाही आणि आत्माज्ञानानंतर तुम्हाला करुणाभाव राहील.

सेवाभावाचे फळ भौतिक सुख आहे आणि कुसेवाभावाचे फळ भौतिक दुःख आहे. सेवाभावाने स्वतःचे 'मी' (आत्मा) सापडत नाही परंतु जोपर्यंत 'मी' सापडत नाही तोपर्यंत परोपकारी स्वभाव ठेवावा.

## खरा समाजसेवक

तुम्ही कोणाला मदत करता का?

**प्रश्नकर्ता :** समाजाच्या सेवेत भरपूर वेळ देत असतो.

**दादाश्री :** समाजसेवा तर अनेक प्रकारची असते. ज्या समाजसेवेत, 'मी समाजसेवक आहे' याचे किंचितमात्र पण भान राहत नाही, ती खरी समाजसेवा.

**प्रश्नकर्ता :** ही गोष्ट बरोबर आहे.

**दादाश्री :** बाकी, समाजसेवक तर जागोजागी आणि प्रत्येक विभागात दोन-चार, दोन-चार असतातच. पांढरी टोपी घालून फिरत असतात समाजसेवक म्हणून. पण जो हे भान विसरेल तो खरा समाजसेवक!

**प्रश्नकर्ता :** काही चांगले काम केले तर मला अहंकार येतो की मी केले.

**दादाश्री :** तो तर येणारच ना.

**प्रश्नकर्ता :** मग ते विसरण्यासाठी काय करू?

**दादाश्री :** मी समाजसेवक आहे याचा अहंकार यायला नको. चांगले काम केले की त्याचा अहंकार होतो, तेव्हा एकच करायचे तुमचे जे इष्टदेव आहेत किंवा ज्या देवाला तुम्ही मानता त्यांना म्हणावे की, 'हे देवा, मला अहंकार करायचा नाही तरी पण होत आहे, मला क्षमा करा.' एवढेच करायचे. होईल एवढे?

**प्रश्नकर्ता :** होईल.

**दादाश्री :** मग एवढे करा ना!

समाजसेवेचा अर्थ काय? बऱ्याच प्रमाणात 'माय' (माझे) तोडून टाकते. 'माय' पूर्णपणे संपले तर तो स्वत: परमात्मा आहे! त्याला नंतर सुख मिळतेच.

## सेवेत अहंकार

**प्रश्नकर्ता :** मग या जगासाठी आपण काहीच करायचे नाही का?

**दादाश्री :** तुम्हाला करायचेच नव्हतेच. हा तर अहंकार उत्पन्न झालेला आहे. फक्त मनुष्यच अहंकार करतो कर्तापणाचा.

**प्रश्नकर्ता :** या ताई डॉक्टर आहेत. एक गरीब 'पेशंट' आला, त्याच्यासाठी त्यांना अनुकंपा (दया) येते. त्या त्याची सुश्रुषा करतात. पण आपल्या सांगण्यानुसार तर अनुकंपा करण्याचा काही प्रश्नच येत नाही ना?

**दादाश्री :** ती अनुकंपासुद्धा नैसर्गिक आहे. पण परत अहंकार करतात की, 'मी कशी अनुकंपा केली!' अहंकार झाला नाही तर काही हरकत नाही. पण अहंकार झाल्याशिवाय राहत नाही.

## सेवेत समर्पणता

**प्रश्नकर्ता :** या जगाच्या सेवेत परमात्म्याच्या सेवेचा भाव ठेवून सेवा केली तर ते कर्तव्यामध्ये येते का?

**दादाश्री :** हो, त्याचे फळ पुण्य मिळते मोक्ष नाही.

**प्रश्नकर्ता :** त्याचे श्रेय साक्षात्कारी परमात्म्याला अर्पण केले तरी मोक्ष मिळणार नाही का?

**दादाश्री :** असे फळ कोणाकडूनही अर्पण केले जात नाही.

**प्रश्नकर्ता :** मानसिक समर्पण केले तर?

**दादाश्री :** तसे समर्पण केले तरी कोणी फळ घेत नाही आणि कोणी देतही नाही. हे तर फक्त बोलण्यापुरतेच आहे. खरा धर्म तर 'ज्ञानी पुरुष' आत्मा प्रदान करतील तेव्हापासूनच आपोआप चालत राहतो आणि व्यवहार धर्म मात्र आपल्याला करावा लागतो, शिकावा लागतो.

## भौतिक समृद्धी, बाय प्रॉडक्शनमध्ये

**प्रश्नकर्ता :** भौतिक समृद्धी प्राप्त करण्याची इच्छा-प्रयत्न आध्यात्मिक विकासात बाधक ठरते का? आणि बाधक असेल तर कशी आणि नसेल तर कशी?

**दादाश्री :** भौतिक समृद्धी प्राप्त करायची असेल तर आपल्याला या दिशेने जावे लागेल, आणि आध्यात्मिक समृद्धी प्राप्त करायची असेल तर त्या दुसऱ्या दिशेने जावे लागेल. आपल्याला ज्या दिशेने जायचे आहे त्याऐवजी दुसऱ्या दिशेने गेलो तर बाधक होईल की नाही?

**प्रश्नकर्ता :** हो ते बाधक होईल.

**दादाश्री :** अर्थात संपूर्णपणे बाधक आहे. आध्यात्मिक दिशा ही आहे तर भौतिक दिशा समोरची आहे.

**प्रश्नकर्ता :** पण भौतिक समृद्धीशिवाय कशाप्रकारे चालेल?

**दादाश्री :** भौतिक समृद्धी या जगात कोणाची झाली आहे का? सगळे जण भौतिक समृद्धीच्या मागे पडले आहेत. झाली का कोणाची समृद्धी?

**प्रश्नकर्ता :** काही जणांचीच होते. सगळ्यांची होत नाही.

**दादाश्री :** मनुष्याच्या हाती ती सत्ता नाही. जिथे सत्ता नाही तिथे व्यर्थ बोंबाबोंब कराल याला काही अर्थ आहे का? अर्थहीन सर्व.

**प्रश्नकर्ता :** जोपर्यंत त्याची काही कामना आहे तोपर्यंत अध्यात्मात कसा जाऊ शकेल?

**दादाश्री :** हो, कामना असते ते ठीक आहे. कामना असते पण आपल्या हातात ती सत्ता नाही.

**प्रश्नकर्ता :** ही कामना कशा प्रकारे संपेल?

**दादाश्री :** त्याच्या कामनेसाठी त्याला असे सर्व मिळतेच. तुम्हाला त्यात जास्त डोकेफोड करायची नाही. आध्यात्मिक करत राहा. ही भौतिक समृद्धी तर बाय प्रॉडक्ट आहे, तुम्ही आध्यात्मिक प्रॉडक्शन सुरू करा. या दिशेने जा आणि आध्यात्मिक प्रॉडक्शन सुरू करा मग भौतिक समृद्धी, बाय प्रॉडक्ट तुम्हाला फ्री ऑफ कॉस्ट मिळेल.

**प्रश्नकर्ता :** आध्यात्मिक रीतीने जायचे असेल तर काय सांगाल? कोणत्या प्रकारे जायला हवे?

**दादाश्री :** नाही, पण आधी हे समजले का तुम्हाला की तुम्ही आध्यात्मिक प्रॉडक्शन केले तर भौतिक हे त्याचे बाय प्रॉडक्ट आहे, हे तुमच्या लक्षात आले का?

**प्रश्नकर्ता :** मला असे वाटते की तुम्ही जे सांगत आहात ते माझ्या लक्षात आलेले नाही.

**दादाश्री :** म्हणून मानून घ्या की हे सर्व बाय प्रॉडक्ट आहे. बाय प्रॉडक्ट म्हणजे फ्री ऑफ कॉस्ट-मोफत. या संसारातील सर्व विनाशी सुख फ्री ऑफ कॉस्ट मिळालेले आहे. आध्यात्मिक सुख प्राप्त करायला जातो तेव्हा मार्गात हे बाय प्रॉडक्शन मिळाले आहे.

**प्रश्नकर्ता :** आम्ही असे बरेच लोक पाहिले आहेत की जे अध्यात्मात जात नाहीत, परंतु भौतिक रूपाने पुष्कळ समृद्ध आहेत आणि त्यात ते सुखी आहेत.

**दादाश्री :** हो, ते अध्यात्मामध्ये जाताना दिसत नाहीत. परंतु पूर्वी जे अध्यात्म केले होते त्याचे फळ त्यांना आता मिळत आहे.

**प्रश्नकर्ता :** याचा अर्थ या जन्मात अध्यात्म केले तर पुढच्या जन्मात त्याचे भौतिक सुख मिळेल?

**दादाश्री :** हो, त्याचे फळ तुम्हाला पुढच्या जन्मात मिळते. म्हणजे फळ दिसते आज पण जरी आज तुम्ही अध्यात्मात नसलात तरीही.

## कार्याचा हेतू सेवा की लक्ष्मी?

प्रत्येक कार्याचा एक हेतू असतो की कोणत्या हेतूने हे कार्य केले जात आहे. त्यात जर उच्च हेतू नक्की केला, जसे की, येथे दवाखाना सुरू करायचा आहे म्हणजे पेशंटला स्वास्थ्य कसे प्राप्त होईल, माणसे कशी सुखी होतील, कशी आनंदात राहतील, त्यांची जीवनशक्ती कशी वाढेल, असा आपला उच्च हेतू नक्की केला असेल आणि त्याच सेवाभावनेने काम केले गेले तर त्याचे बाय प्रॉडक्शन काय? तर लक्ष्मी (पैसा)! म्हणून लक्ष्मी ही बाय प्रॉडक्ट आहे, तिला प्रॉडक्शन मानू नका. जगात सर्वांनी लक्ष्मीचेच प्रॉडक्शन केले आहे, म्हणून त्यांना बाय प्रॉडक्शनचा लाभ मिळत नाही.

याकरता तुम्ही फक्त सेवाभावच नक्की केला तर बाय प्रॉडक्शनमध्ये लक्ष्मी अधिक प्रमाणात येते. म्हणजे लक्ष्मीला जर बाय प्रॉडक्टमध्येच ठेवली तर लक्ष्मी अधिक येते. परंतु येथे तर लक्ष्मीच्या हेतूनेच लक्ष्मीचे प्रॉडक्शन करतात म्हणून लक्ष्मी येत नाही. म्हणूनच आम्ही तुम्हाला सांगतो की एकच हेतू ठेवा. 'निरंतर सेवाभाव' तर बाय प्रॉडक्ट आपोआप येत राहील. जसे बाय प्रॉडक्टमध्ये कोणतीही

मेहनत करावी लागत नाही, खर्च करावा लागत नाही ते फ्री ऑफ कॉस्ट मिळते. तसेच ही लक्ष्मी सुद्धा फ्री ऑफ कॉस्ट मिळते. तुम्हाला अशी लक्ष्मी पाहिजे की ऑनची (लाच लुचपतीची) लक्ष्मी पाहिजे? ऑनची लक्ष्मी नको ना? मग ठीक आहे! ही फ्री ऑफ कॉस्ट मिळाली तर किती चांगले!

म्हणून सेवाभाव नक्की करा. मनुष्यमात्रांची सेवा. कारण आपण दवाखाना काढला याचा अर्थ आपल्याला जी विद्या अवगत आहे त्या विद्येचा सेवाभावात उपयोग करणे, हाच आपला हेतू असावा. त्याचे फलस्वरूप इतर गोष्टी फ्री ऑफ कॉस्ट मिळत राहतील. आणि नंतर लक्ष्मीची कधीही कमतरता भासणार नाही, आणि जे केवळ लक्ष्मीसाठीच करायला गेले त्यांना तोटा झाला. हो, लक्ष्मीसाठी कारखाना काढला तर ते बाय प्रॉडक्ट राहिलेच नाही ना! कारण लक्ष्मी हिच बाय प्रॉडक्ट आहे, बाय प्रॉडक्शनची. तेव्हा आधी आपण प्रॉडक्शन नक्की करायचे म्हणजे मग बाय प्रॉडक्शन फ्री ऑफ कॉस्ट मिळत राहील.

## जगत कल्याण, हेच प्रॉडक्शन

आत्मा प्राप्त करण्यासाठी जे काही केले जाते ते प्रॉडक्शन आहे आणि त्यामुळे बाय प्रॉडक्शन मिळत राहते. सांसारिक सर्व गरजा पूर्ण होत जातात. मी माझे एकच प्रकारचे प्रॉडक्शन ठेवलेले आहे. 'हे जग परम शांती प्राप्त करो आणि कित्येक जण मोक्ष प्राप्त करोत.' हे माझे प्रॉडक्शन आणि त्याचे बाय प्रॉडक्शन मला मिळतच राहते. हे चहा–पाणी आम्हाला तुमच्यापेक्षा वेगळ्या प्रकारचे मिळते त्याचे कारण काय? तर तुमच्या तुलनेत माझे प्रॉडक्शन उच्च कोटीचे आहे. असेच तुमचे प्रॉडक्शन उच्च कोटीचे झाले तर बाय प्रॉडक्शनसुद्धा उच्च कोटीचे येईल. प्रत्येक कार्याचा हेतू असतो. जर सेवाभावाचा हेतू असेल तर लक्ष्मी 'बाय प्रॉडक्ट' मध्ये मिळेलच.

## सेवा परोक्ष रूपाने भगवंताची

दुसरी सर्व प्रॉडक्शन्स बाय प्रॉडक्ट आहेत. त्यात आपल्या गरजेच्या सर्व गोष्टी मिळतात आणि त्या इझीली (सहज) मिळतात. पाहा ना, प्रॉडक्शन पैशांचे केले म्हणून तर आज पैसे इझीली मिळत नाहीत. नुसती पळापळ, धांदरटासारखे फिरतात. जणू चेहऱ्याला एरंडेल तेल लावून फिरत आहेत असे दिसतात. घरात सुंदर खाण्या-पिण्याचे आहे, कितीतरी सुविधा आहेत, रस्ते किती चांगले आहेत, रस्त्यावरून चाललो तरी पाय धुळीचे होत नाहीत! म्हणून मनुष्यांची सेवा करा. माणसांमध्ये भगवंत विराजमान आहेत. भगवंत आतच बसलेले आहेत. बाहेर भगवंताला शोधायला जाल तर मिळतील असे नाही.

तुम्ही मनुष्यांचे डॉक्टर आहात म्हणून तुम्हाला मनुष्यांची सेवा करायला सांगतो. जनावरांचे डॉक्टर असतील तर त्यांना जनावरांची सेवा करायला सांगितली असती. जनावरांमध्ये देखील भगवंत विराजमान आहेत पण या मनुष्यांमध्ये भगवंत विशेष रूपाने प्रकट झालेले आहेत!

## सेवा-परोपकाराहून पुढे मोक्षमार्ग

**प्रश्नकर्ता :** मोक्षमार्ग समाजसेवेच्या मार्गापेक्षा उच्च कसा आहे हे, जरा समजवा.

**दादाश्री :** समाजसेवकाला आम्ही विचारले की तुम्ही कोण आहात? तर तो म्हणेल, 'मी समाजसेवक आहे.' काय म्हणतो? हेच म्हणतो ना की दुसरे काही?

**प्रश्नकर्ता :** हेच म्हणतो.

**दादाश्री :** याचा अर्थ 'मी समाजसेवक आहे' असे बोलणे हाच त्याचा इगोइजम (अहंकार) आहे, आणि या भाऊला विचारले की, 'तुम्ही कोण आहात?' तर तो म्हणेल, 'बाहेर ओळखण्यासाठी मी

चंदुभाऊ आहे आणि खरोखर तर मी शुद्धात्मा आहे' तर त्यात इगोइजम नाही. विदाऊट इगोइजम.

समाजसेवकाचा इगो चांगल्या कार्यासाठी असला तरी आहे तर इगोच. वाईट कार्यासाठी इगो असेल तर 'राक्षस' म्हटला जाईल. चांगल्या कार्यासाठी इगो असेल तर देव म्हटला जातो. इगो म्हणजे इगो. इगो म्हणजे सतत भटकतच राहायचे आणि इगो संपला की येथेच मोक्ष होईल.

## 'मी कोण आहे' हे जाणणे हाच धर्म

**प्रश्नकर्ता :** प्रत्येक जीवाने काय करायला हवे, त्याचा धर्म काय आहे ?

**दादाश्री :** जे काही करत आहे तो त्याचाच धर्म आहे. पण आपण म्हणतो की माझा धर्म, इतकेच. त्याचा आपण इगोइजम करतो की मी हे केले. तेव्हा आता आपण काय करायला हवे की 'मी कोण आहे' हे जाणणे, त्यासाठी प्रयत्न करणे, तर मग सर्व कोडी सुटतील. मग कोडी उत्पन्नच होणार नाहीत. आणि कोडी सुटल्या की तो स्वतंत्र होत जाईल.

## लक्ष्मी, ती तर बाय प्रॉडक्शनमध्ये

**प्रश्नकर्ता :** प्रत्येक मनुष्याचे कर्तव्य, मग तो वकील असो किंवा डॉक्टर असो, कर्तव्य तर हेच असते ना की मनुष्यमात्रांचे भले करणे ?

**दादाश्री :** हो, पण 'भले करायचे आहे' हा निश्चय केल्याशिवायच करत राहतात. कोणताही निर्णय घेत नाहीत. कोणताही हेतू निश्चित केल्याशिवाय अशीच गाडी चालत राहते. कोणत्या गावी जायचे हे माहिती नाही, कोणत्या गावी उतरायचे हे ठरलेले नाही. वाटेत चहा-नाश्ता कुठे करायचा हेही निश्चित नाही. बस, सारखा पळतच राहतो. म्हणून सगळा गुंता होत जातो. हेतू निश्चित केल्यानंतर सर्व कार्य करावे.

आपल्याला फक्त हेतूच बदलायचा आहे, दुसरे काहीच करायचे नाही. पंपाच्या इंजिनाचा एक पट्टा या बाजूने दिला तर पाणी निघेल आणि त्या बाजूने दिला तर साळीमधून तांदूळ निघतील. थोडक्यात फक्त पट्टा देण्यातच फरक आहे. हेतू पक्का करायचा आणि तो हेतू कायम लक्षात ठेवायचा. बस, दुसरे काहीच नाही. लक्ष्मीचे लक्ष्य ठेवायचे नाही.

## 'स्वतःच्या' सेवेत सामावलेत सर्व धर्म

दोनच प्रकारचे धर्म. तिसऱ्या प्रकारचा कोणताही धर्म नाही. ज्या धर्मात जगाची सेवा आहे, तो एक प्रकारचा धर्म आहे आणि जिथे स्वतःची-आत्म्याची सेवा आहे तो दुसऱ्या प्रकारचा धर्म आहे. स्वतःची सेवा करणारे होम डिपार्टमेंटमध्ये (आत्म स्वरूपात) येतात आणि जे जगाची सेवा करतात त्यांना सांसारिक लाभ मिळतात अथवा भौतिक सुखात मजा करतात. आणि ज्यामध्ये जगाची कोणत्याही प्रकारची सेवा सामावली जात नाही, जिथे स्वतःच्या सेवेचा समावेश होत नाही, ती सर्व एकप्रकारे सामाजिक भाषणे आहेत! आणि स्वतःला भयंकर नशा चढवणारी आहेत. जगाची कोणतीही सेवा होत असेल तर तो धर्म आहे. जगाची सेवा होत नसेल तर स्वतःची सेवा करा. जो स्वतःची सेवा करतो तो जगाची सेवा करणाऱ्यापेक्षाही वरचढ आहे. कारण स्वतःची सेवा करणारा कोणालाही दुःख देत नाही.

**प्रश्नकर्ता :** परंतु स्वतःची सेवा करण्याचे सुचले पाहिजे ना?

**दादाश्री :** ते सुचणे सोपे नाही.

**प्रश्नकर्ता :** स्वतःची सेवा कशा प्रकारे करायची?

**दादाश्री :** त्यासाठी जे स्वतःची सेवा करतात अशा ज्ञानी पुरुषांना विचारा की, 'साहेब, आपण दुसऱ्यांची सेवा करता की स्वतःची?' तेव्हा साहेब सांगतील, 'आम्ही स्वतःचीच सेवा करतो.' तेव्हा आपण त्यांना म्हणायला हवे की, 'मलाही असा मार्ग दाखवा.'

## 'स्वत:'च्या सेवेचे लक्षण

**प्रश्नकर्ता :** स्वत:च्या सेवेची लक्षण कोणती?

**दादाश्री :** 'स्वत:'ची सेवा म्हणजे कोणालाही दु:ख द्यायचे नाही, हे सर्वात पहिले लक्षण. त्यात सर्व गोष्टी येऊन जातात. त्यात मग अब्रह्मचर्याचेही सेवन करायचे नाही. अब्रह्मचर्याचे सेवन करणे म्हणजे दुसऱ्याला दु:ख देण्यासारखे आहे. जरी राजीखुशीने अब्रह्मचर्य झाले तरी त्यात कितीतरी जीव मारले जातात! म्हणून ते दु:ख देण्यासारखेच आहे. त्यामुळे सेवाच बंद होऊन जाते. त्यानंतर खोटे बोलायचे नाही, चोरी करायची नाही, हिंसा करायची नाही आणि धन साठवायचे नाही. परिग्रह करणे, पैसे साठवणे ही हिंसाच आहे. दुसऱ्यांना दु:ख देतो यातच सर्व येते.

**प्रश्नकर्ता :** स्वत:च्या सेवेची दुसरी लक्षणे कोणकोणती आहेत? स्वत:ची सेवा करत आहे असे केव्हा म्हटले जाईल?

**दादाश्री :** 'स्वत:'ची सेवा करणाऱ्याला भलेही जगातील सगळे जण दु:ख देतील पण तो मात्र कोणालाही दु:ख देत नाही. दु:ख तर देत नाहीच, पण वाईट भाव देखील करत नाही की तुझे वाईट व्हावे! 'तुझे भले होवो' असेच म्हणतो.

हो, तरी पण समोरचा बोलला तरी हरकत नाही. समोरचा बोलला की, तुम्ही नालायक आहात, बदमाश आहात, तुम्ही दु:ख देता, पण त्यात आपली हरकत नसावी. आपण काय करतो हे आपल्याला बघायचे आहे. समोरची व्यक्ती तर रेडिओप्रमाणे बोलतच राहील, जणू रेडिओ वाजतो तसा!

**प्रश्नकर्ता :** आयुष्यात सगळे आपल्याला दु:ख देतील आणि तरीही आम्ही सहन करू असे तर होणार नाही. घरातील लोकांनी जरासे जरी अपमानजनक वर्तन केले तरी सहन होत नाही, तेव्हा?

**दादाश्री :** तेव्हा काय कराल? याच्यात नाही राहणार तर कशात राहाल हे सांगा मला? हे जे मी सांगतो ती लाईन पसंत पडत नसेल तर त्या व्यक्तीने कशात राहायचे? सेफसाइड आहे का दुसरी कोणती? असेल तर दाखवा मला.

**प्रश्नकर्ता :** नाही, असे नाही. पण आपला 'इगो' तर आहेच ना?

**दादाश्री :** जन्मापासून सगळ्यांना 'इगो'च अडवतो पण 'आपल्याला अडकायचे नाही,' 'इगो' आहे तो वाटेल तसा नाचो पण 'आपल्याला' नाचण्याची गरज नाही. आपण इगोपेक्षा वेगळे आहोत.

## ...याशिवाय सारे धार्मिक मनोरंजन

म्हणजे दोनच धर्म आहेत, तिसरा धर्म नाही. बाकी तर ऑर्नामेंट आहे. ऑर्नामेंट पोर्शन आणि लोक 'वाह वाह' करतात.

जिथे सेवा नाही, कोणत्याही प्रकारची सेवा नाही, जगाची सेवा नाही ते सर्व धार्मिक मनोरंजन आहे आणि सर्व ऑर्नामेंटल पोर्शन आहे.

बुद्धीचा धर्म तोपर्यंत स्वीकारला जातो जोपर्यंत बुद्धी सेवाभावी आहे, इतर जीवांना सुख देणारी आहे अशी बुद्धी असेल तर ती चांगली. बाकी, दुसरी बुद्धी बेकार आहे. दुसरी बुद्धी तर उलट बांधणारी आहे, बांधून मार खायला लावते आणि जिथे तिथे फायदा-नुकसान दाखवत राहते. बसमध्ये चढल्यावर आधी बघते की बसायला जागा कुठे आहे? याप्रमाणे बुद्धी इकडे-तिकडे भटकवत राहते. दुसऱ्यांची सेवा करणारी बुद्धी चांगली, नाही तर स्वतःच्या सेवेसारखी तर दुसरी कोणतीही बुद्धी नाही. जो 'स्वतः'ची सेवा करतो तो साऱ्या जगाची सेवा करत आहे.

## जगात कोणालाही दुःख न होवो

म्हणून आम्ही सगळ्यांना सांगतो की भाऊ, सकाळी घराबाहेर

निघण्याआधी दुसरे काही येत नसेल तर एवढेच म्हणत जा की, माझ्या 'मन-वचन-कायेने या जगातील कोणत्याही जीवाला किंचितमात्र दु:ख न होवो.' असे पाच वेळा बोलून निघावे, मग बाकीची जबाबदारी माझी. जा, दुसरे काही नाही आले तरी मी बघेन. एवढेच बोल आणि मग कोणाला दु:ख झालेच तर ते मी बघेन पण तू एवढेच बोलायचे. मग यात काही अडचण आहे का?

**प्रश्नकर्ता :** अजिबात अडचण नाही.

**दादाश्री :** हे तू नक्कीच बोल. मग तू म्हणशील की, 'माझ्याकडून दु:ख दिले गेले तर?' ते तुला बघायचे नाही. ते सर्व मी हायकोर्टात करून घेईन. ते तर वकीलाने बघायचे आहे ना? ते सगळे मी करून देईन.' तू माझे हे वाक्य फक्त बोलत जा ना, सकाळी पाच वेळा. यात काही अडचण आहे? काही कठीण आहे का यात? मनापासून 'दादा भगवानां'ना आठवून बोला ना, मग काय अडचण आहे?

**प्रश्नकर्ता :** आम्ही असेच करतो.

**दादाश्री :** बस, तेच करायचे आहे. दुसरे काही करण्यासारखे नाही या जगात.

## थोडक्यात, व्यवहार धर्म

संसारातील लोकांना व्यवहार धर्म शिकवण्यासाठी आम्ही सांगतो की परानुग्रही बना. स्वत:साठी विचारच यायला नको. लोककल्याणासाठी परानुग्रही बना. तू स्वत:साठी खर्च करशील तर ते गटारात जाईल आणि इतरांसाठी थोडा जरी खर्च करशील तर पुढे एडजस्टमेंट मिळेल.

शुद्धात्मा भगवान काय म्हणतात की, 'जो दुसऱ्यांना सांभाळतो त्याला मी सांभाळून घेतो आणि जो स्वत:लाच सांभाळतो, त्याला मी त्याच्यावरच सोडतो.'

जगाचे काम करा, आपले काम होत राहील. जगाचे काम कराल तर आपले काम आपोआप होत राहील आणि तेव्हा तुम्हाला आश्चर्य वाटेल.

जगाचे स्वरूप कसे आहे ? जगातील जीवमात्रांमध्ये भगवंत आहेत. कोणत्याही जीवाला काहीही त्रास द्याल, दु:ख द्याल तर तो अधर्म होईल. कोणत्याही जीवाला सुख द्याल तर तो धर्म होईल. अधर्माचे फळ आपल्या इच्छेविरुद्ध आहे. धर्माचे फळ आपल्या इच्छेनुसार आहे.

'रिलेटिव्ह धर्म' हा संसार मार्ग आहे, समाजसेवेचा मार्ग आहे. मोक्षमार्ग समाजसेवेहून वेगळा आहे, स्व–रमणतेचा आहे.

## धर्माची सुरुवात

मनुष्याने जेव्हापासून इतरांना सुख द्यायला सुरुवात केली तेव्हापासून धर्माची सुरुवात झाली. स्वत:चे सुख नाही परंतु समोरच्याची अडचण कशी दूर होईल हा विचार असतो तेव्हापासून करुणेची सुरुवात होते. माझा लहानपणापासूनच समोरच्या व्यक्तीची अडचण दूर करण्याचा प्रयत्न असायचा. स्वत:साठी विचारसुद्धा आले नाहीत, ती करुणा म्हटली जाते, त्यामुळेच 'ज्ञान' प्रकट झाले.

रिटायर होण्याच्या वेळेस माणूस ऑनररी प्रेसिडेंट होतो. तो ऑनररी होतो. अरे वेड्या, जबाबदारी का वाढवून घेतोस ? आता रिटायर होत आहेस तरीही संकट का निर्माण करतोस. ही सर्व संकटे निर्माण केलेली आहेत.

समाजसेवा होऊ शकत नाही, तर ठीक आहे पण कोणाला दु:ख होणार नाही हे मात्र बघायला पाहिजे. त्याने जरी आपले नुकसान केले असेल तरीही. कारण तो पूर्वीचा काही हिशोब असेल, परंतु आपल्याकडून त्याला दु:ख होणार नाही हेच बघायचे.

## बस, हेच शिकण्यासारखे

**प्रश्नकर्ता :** दुसऱ्यांना सुख देऊन सुखी होणे हे?

**दादाश्री :** हो, बस. एवढेच शिका ना! दुसरे काही शिकण्यासारखे नाही. जगात दुसरा कोणताही धर्म नाही. हा एवढाच धर्म आहे, दुसरा कोणताच धर्म नाही. इतरांना सुखी करा त्यातूनच सुखी व्हाल.

तुम्ही जो व्यापार-धंदा करता, त्यात काही कमावत असाल तर एखाद्या गावात कुणी दु:खी असेल त्याला थोडे धान्य वगैरे द्या, मुलीच्या लग्नासाठी काही रक्कम द्या. अशा प्रकारे त्याची गाडी रूळावर आणली पाहिजे. इतरांना सुख-शांती दिली तर भगवंत आपल्याला सुख-शांती देतील.

## ज्ञानी देतील, लेखी गॅरंटी

**प्रश्नकर्ता :** कोणाला सुख द्यायला गेलो तर खिसा कापला जातो.

**दादाश्री :** खिसा भलेही कापला जावो, तो मागचा हिशोब असेल जो आता चुकता होत आहे. पण आता तुम्ही सुख दिले तर त्याचे फळ येईलच, याची शंभर टक्के लेखी गॅरंटी देतो. पूर्वी आम्ही दिले असेल म्हणून आज आम्हाला सुख मिळत आहे. माझा धंदाच हा आहे की सुखाचे दुकान काढावे. आपण दु:खाचे दुकान काढू नये. सुखाचे दुकान, मग ज्याला सुख हवे असेल त्याने घेऊन जावे. आणि कोणी दु:ख द्यायला आले तर आपण म्हणायचे, 'ओहोहो, अजून बाकी आहे माझे, आणा, आणा.' ते घेऊन आपण एकीकडे ठेवून द्यावे. म्हणजे कोणी दु:ख देण्यासाठी आले तर घेऊन टाकायचे. आपला हिशोब आहे म्हणून द्यायला तर येणारच ना? नाही तर मला तर कोणीच दु:ख द्यायला येत नाही.

म्हणून सुखाचे दुकान असे उघडा की बस, सगळ्यांना सुखच

द्यायचे. दु:ख कोणालाही द्यायचे नाही आणि दु:ख देणाऱ्याला तर कधी कोणी चाकू सुद्धा मारतो ना? तो वाट बघत बसलेला असतो. ही जी वैराची वसूली करतात ते असेच वैर वसूल करत नाहीत, तर दु:खाचा बदला घेतात.

## सेवा कराल तर सेवा मिळेल

या जगात सर्व प्रथम सेवा करण्यासाठी योग्य साधन आहेत ते आई-वडील.

आई-वडिलांची सेवा केली तर शांती जात नाही. परंतु आज मनापासून आई-वडिलांची सेवा केली जात नाही. तीस वर्षांचा झाला की 'गुरु' (पत्नी) येते. ती म्हणते की, मला नवीन घरात घेऊन जा. गुरु पाहिलेत का तुम्ही? पंचविसाव्या-तिसाव्या वर्षी 'गुरु' मिळतात आणि 'गुरु' मिळाले की सर्व बदलून जाते. गुरु म्हणेल, आईला तुम्ही ओळखलेच नाही. पहिल्यांदा तर तो तिचे ऐकत नाही पण मग दोन-तीनदा सांगितल्यावर तो रूळ बदलतो.

बाकी, आई-वडिलांची शुद्ध सेवा केली तर त्याला कधी अशांती होत नाही, असे हे जग आहे. हे जग काही दुर्लक्ष करण्यासारखे नाही. तेव्हा लोक असे विचारतात ना की यात मुलांचाच दोष ना की ते आई-वडिलांची सेवा करत नाहीत. त्यात आई-वडिलांचा काय दोष? मी म्हटले, त्यांनी त्यांच्या आई-वडिलांची सेवा केली नव्हती म्हणून त्यांना आता सेवा प्राप्त झाली नाही. अर्थात हा वारसाच खोटा आहे. त्यापेक्षा आता नव्याने वारशाच्या रूपात चालले तरच चांगले होईल.

मी प्रत्येक घर असे बनवत आहे की जिथे मुले सर्व ऑल राइट झाली आहेत. आई-वडीलही ऑल राइट आणि मुलेही ऑल राइट!

वडीलधाऱ्यांची सेवा केल्याने आपले विज्ञान उमलत जाते.

मूर्तीची सेवा केली जाते का? मूर्तीचे काय पाय दुखतात का? सेवा तर पालक, वडीलधारी माणसे किंवा गुरु असतील त्यांचीच करायला पाहिजे.

## सेवेचा तिरस्कार करून धर्म होतो का?

आई-वडिलांची सेवा करणे हा धर्म आहे. मग तो हिशोब कसाही असला तरीही सेवा करणे हा आपला धर्म आहे. आणि जेवढे आपल्या धर्माचे पालन करू तेवढेच सुख आपल्याला मिळत जाईल. वडीलघऱ्यांची सेवा तर होतेच, त्याचबरोबर सुखही मिळत जाते. आई-वडिलांना सुखी ठेवले तर आपण सुखी होतो. आई-वडिलांना सुखी ठेवणाऱ्या मुलांना कधीच दुःख मिळत नाही.

एक भाऊ मला एका मोठ्या आश्रमात भेटले. मी विचारले, 'तुम्ही येथे कसे?' त्यावर तो म्हणाला, 'मी या आश्रमात गेल्या दहा वर्षांपासून राहत आहे.' तेव्हा मी त्याला म्हटले, 'गावात तुमचे आई-वडील उतारवयात खूप गरिबीत, दुःखात जगत आहेत.' त्यावर तो म्हणाला,' त्याला मी काय करू? मी त्यांचे करायला गेलो तर माझा धर्म करायचा राहून जाईल.' याला धर्म कसे म्हणणार? धर्म करणे म्हणजे आई-वडिलांना, भावांना सगळ्यांना धरून चालणे, त्यांची विचारपूस करणे. व्यवहार आदर्श असायला हवा. जो व्यवहार स्वतःच्या धर्माचा तिरस्कार करतो, आई-वडिलांच्या नात्याचा तिरस्कार करतो त्याला धर्म कसे म्हणणार?

तुमचे आई-वडील आहेत की नाही?

**प्रश्नकर्ता :** आई आहे.

**दादाश्री :** आता तिची चांगली सेवा करा. वारंवार संधी मिळणार नाही आणि कोणी म्हणेल की, 'मी दुःखी आहे.' तर मी त्याला सांगेन की तुझ्या आई-वडिलांची चांगल्या प्रकारे सेवा कर. तरच

संसारातील दु:ख तुझ्या वाट्याला येणार नाही. भले श्रीमंत होणार नाहीस पण दु:खीही होणार नाहीस. नंतर धर्म असावा. याला धर्मच कसा म्हणणार?

मी सुद्धा आईची सेवा केली होती. तेव्हा मी वीस वर्षाचा अर्थात तरुणच होतो म्हणून आईची सेवा करू शकलो. वडिलांना खांदा दिला होता तेवढीच सेवा झाली होती. मग विचार केला की अरे, असे तर कितीतरी वडील होऊन गेलेत. तर आता काय करणार? तेव्हा उत्तर मिळाले, जे आहेत त्यांची सेवा कर. जे गेले, ते गेले त्यांची चिंता करू नकोस. सगळे खूप झाले. चुकलात तिथून परत मोजा. आई-वडिलांची सेवा प्रत्यक्ष रोख आहे. भगवंत दिसत नाहीत पण हे तर दिसतात. भगवंत कुठे दिसतात? आई-वडील तर दिसतात.

## खरी आवश्यकता वृद्धांच्या सेवेची

आता जर सगळ्यात जास्त कोणी दु:खी असतील तर ते साठ-पासष्ट वयाचे वृद्ध खूप दु:खी आहेत. पण ते कोणाला सांगतील? मुले ऐकत नाहीत. दोघांमध्ये खूप दरी निर्माण झाली आहे. जुना काळ आणि नवा काळ. जुने लोक जुना काळ सोडत नाहीत. मार खातील पण तरीही सोडणार नाहीत.

**प्रश्नकर्ता :** पासष्टाव्या वर्षी प्रत्येकाची हीच स्थिती असते ना?

**दादाश्री :** हो, अशीच स्थिती, तेच हाल. खरोखर करण्यासारखे काय आहे या काळात? तर एखाद्या ठिकाणी वृद्धांना राहण्यासाठी ठिकाण बनवले तर खूप चांगली गोष्ट होईल. म्हणून आम्ही विचार केला होता. मी सांगितले की, असे काही करायचे असेल तर आधी त्यांना हे 'ज्ञान' द्यायला हवे. नंतर त्यांच्या खाण्या-पिण्याची व्यवस्था तर लोकांना किंवा अन्य सामाजिक संस्थेला सोपवून दिली तरी चालेल. पण आधी हे ज्ञान दिले असेल तर दर्शन करत राहिले तरी

त्यांचे काम होत राहील. आणि हे 'ज्ञान' दिले असेल तर शांती राहील बिचाऱ्यांना. नाही तर कोणत्या आधारावर शांती राहील? तुम्हाला काय वाटते?

**प्रश्नकर्ता :** हो बरोबर आहे.

**दादाश्री :** पसंत पडेल अशी गोष्ट आहे की नाही?

वृद्धावस्था आणि साठ-पासष्ट वयाची व्यक्ती असेल आणि घरात राहत असेल. घरातील कोणीही त्यांना गृहीत धरत नसतील तर मग काय होईल? कोणाला काही बोलू शकत नाही आणि मनातच उलटे विचार करत कर्मे बांधून घेईल. म्हणून या लोकांनी जी वृद्धाश्रमाची व्यवस्था केली आहे ती व्यवस्था चुकीची नाही, हेल्पिंग आहे. पण त्यासाठी वृद्धाश्रम नाही तर खूप सन्मानसूचक शब्द असावा. असा शब्द जो सन्माननीय वाटेल.

## सेवेने जीवनात सुख-संपत्ती

प्रथम आई-वडिलांची सेवा, ज्यांनी जन्म दिला त्यांची. नंतर गरूची सेवा. गुरु आणि आई-वडिलांची सेवा तर अवश्य केली पाहिजे. गुरु जर चांगले नसतील तर ती सेवा सोडायला पाहिजे.

**प्रश्नकर्ता :** आता जे आई-वडिलांची सेवा करत नाहीत त्यांचे काय? त्यांना कोणती गती मिळेल?

**दादाश्री :** आई-वडिलांची सेवा जे करत नाहीत ते या जन्मात सुखी होत नाहीत. आई-वडिलांची सेवा करण्याचे प्रत्यक्ष उदाहरण काय? तर साऱ्या आयुष्यात त्यांना दुःख येत नाही. आई-वडिलांची सेवा केल्याने अडचणीही येत नाहीत.

आपल्या हिंदुस्तानाचे विज्ञान खूप सुंदर होते. म्हणून तर शास्त्रकारांनी सांगितले आहे की आई-वडिलांची सेवा करा. ज्यामुळे

आपल्या आयुष्यात कधीच पैशांची अडचण येणार नाही. आता ते न्यायसंगत आहे की नाही ही गोष्ट वेगळी आहे. परंतु आई–वडिलांची सेवा अवश्य करायलाच हवी. कारण जर तुम्ही सेवा केली नाही तर तुम्हाला कोणाकडून सेवा मिळेल? तुमची येणारी पिढी कशी शिकेल की तुम्ही सेवा करण्यासाठी लायक आहात? मुले सगळे बघत असतात. ते बघतील की आपल्या वडिलांनी कधी स्वतःच्या वडिलांची सेवा केली नाही. तेव्हा मग मुलांवर तसे संस्कार तर होणारच नाहीत ना?

**प्रश्नकर्ता :** मला असे विचारायचे होते की मुलांचे वडिलांसाठी कर्तव्य काय आहे?

**दादाश्री :** मुलांनी वडिलांसाठी कर्तव्य निभावले पाहिजे. आणि मुलाने जर कर्तव्य निभावले तर त्याला काय फायदा होईल? आई–वडिलांची सेवा जो मुलगा करेल त्याला कधीच पैशांची कमी राहणार नाही. त्याच्या सर्व गरजा पूर्ण होतील आणि जो गुरुची सेवा करेल त्याला मोक्ष मिळेल. पण आजची पिढी आई–वडील किंवा गुरुची सेवा करतच नाही, ते सगळे जण दुःखी होणार आहेत.

## महान उपकारी आई–वडील

जो मनुष्य आई–वडिलांचे दोष बघतो त्याची कधीच भरभराट होत नाही. कदाचित श्रीमंत बनेल पण त्याची आध्यात्मिक उन्नती होत नाही. आई–वडिलांचे दोष बघता कामा नयेत. उपकार तर कधीच विसरायला नकोत. कोणी चहा पाजला असेल तर त्याचेही उपकार आपण विसरत नाही, मग आपण आई–वडिलांचे उपकार का विसरतो? तुला समजले? हं... अर्थात खूप उपकार मानायला हवेत. खूप सेवा करायला पाहिजे. आई–वडिलांची खूप सेवा केली पाहिजे.

या जगात तिघांचे महान उपकार आहेत. त्या उपकारांना कधीच

विसरायचे नाही. आई–वडील आणि गुरु! आपल्याला ज्यांनी योग्य मार्गावर चालायला शिकविले त्या तिघांचे उपकार कधीच विसरायचे नाहीत.

## 'ज्ञानीं'च्या सेवेचे फळ

आपले सेव्यपद गुप्त ठेवून सेवकभावात राहून आपण काम केले पाहिजे. 'ज्ञानी पुरुष' तर साऱ्या 'जगा'चे सेवक आणि सेव्य म्हटले जातात. साऱ्या जगाची सेवा पण 'मी'च करतो आणि साऱ्या जगाची सेवाही 'मी'च घेतो, हे जर तुला समजले तर कल्याणच होईल!

'आम्ही' इतकीच जबाबदारी घेतो की कोणी व्यक्ती आम्हाला भेटायला आली तर त्याला 'दर्शना'चा लाभ प्राप्त व्हायलाच हवा. 'आमची' सेवा कोणी केली तर त्याची जबाबदारी आमच्यावर येते आणि आम्हाला त्याला मोक्षाला घेऊन जावेच लागते.

– **जय सच्चिदानंद**

# शुद्धात्म्याप्रति प्रार्थना

हे अंतर्यामी परमात्मा! आपण प्रत्येक जीवमात्रांमध्ये विराजमान आहात, तसेच माझ्यामध्ये पण विराजमान आहात, आपले स्वरूप हेच माझे स्वरूप आहे, माझे स्वरूप शुद्धात्मा आहे.

हे शुद्धात्मा भगवान! मी आपल्याला अभेदभावाने अत्यंत भक्तिपूर्वक नमस्कार करीत आहे.

अज्ञानतेमुळे मी जे जे ★★ दोष केले आहेत, त्या सर्व दोषांना आपल्या समक्ष जाहीर करीत आहे. त्यांचा हृदयपूर्वक खूप पश्चाताप करीत आहे आणि आपल्यापाशी क्षमा प्रार्थित आहे. हे प्रभू! मला क्षमा करा, क्षमा करा, क्षमा करा आणि पुन्हा असे दोष करू नये अशी आपण मला शक्ती द्या, शक्ती द्या, शक्ती द्या.

हे शुद्धात्मा भगवान! आपण अशी कृपा करा की आमचे भेदभाव मिटून जावेत आणि अभेद स्वरूप प्राप्त व्हावे. आम्ही आपल्यात अभेद स्वरूपाने तन्मयाकार राहू.

★★ (जे जे दोष झाले असतील ते मनात जाहीर करावे.)

# प्रतिक्रमण विधी

प्रत्यक्ष 'दादा भगवानांच्या' साक्षीने देहधारी ..... (ज्याच्या प्रति दोष झाला असेल त्या व्यक्तीचे नाव) च्या मन-वचन-कायेचे योग, भावकर्म, द्रव्यकर्म, नोकर्माहून भिन्न असे हे शुद्धात्मा भगवान! आपल्या साक्षीने, आजच्या दिवसापर्यंत माझ्याकडून जे जे ★★ दोष झाले आहेत, त्यांची क्षमा मागत आहे, हृदयपूर्वक खूप पश्चाताप करीत आहे. मला क्षमा करा, क्षमा करा, क्षमा करा. आणि पुन्हा असे दोष कधीही करणार नाही, असा दृढ निश्चय करीत आहे, त्यासाठी मला परम शक्ती द्या.

★★ (आयुष्यभरात क्रोध-मान-माया-लोभ, विषय-विकार, कषाय इत्यादीपासून त्या व्यक्तीला जे जे दु:ख दिले गेले असेल, त्या सर्व दोषांना मनात आठवावे.)

# दादा भगवान फाउन्डेशनची प्रकाशित मराठी पुस्तकें

1. भोगतो त्याची चूक
2. एडजस्ट एवरीव्हेर
3. जे घडले तोच न्याय
4. संघर्ष टाळा
5. मी कोण आहे ?
6. क्रोध
7. चिंता
8. प्रतिक्रमण (सं)
9. भावना सुधारे जन्मोजन्म
10. कर्माचे विज्ञान
11. पाप-पुण्य
12. आई-वडील आणि मुलांचा व्यवहार (सं)
13. पति-पत्नीचा दिव्य व्यवहार (सं)
14. समजपूर्वक प्राप्त ब्रह्मचर्य (सं)
15. मानव धर्म
16. मृत्युवेळी, आधी आणि नंतर
17. सेवा-परोपकार
18. दान
19. त्रिमंत्र
20. वर्तमान तीर्थंकर श्री सीमंधर स्वामी
21. चमत्कार
22. सत्य-असत्याचे रहस्य
23. वाणी, व्यवहारात (सं)
24. पैशांचा व्यवहार (सं)
25. क्लेश रहित जीवन
26. निजदोष दर्शनाने... निर्दोष!
27. प्रेम
28. गुरू-शिष्य
29. अहिंसा
30. आप्तवाणी-1, 2, 3

# हिन्दी

1. आत्मसाक्षात्कार
2. ज्ञानी पुरुष की पहचान
3. सर्व दु:खों से मुक्ति
4. कर्म का सिद्धांत
5. आत्मबोध
6. मैं कौन हूँ ?
7. पाप-पुण्य
8. भुगते उसी की भूल
9. एडजस्ट एवरीव्हेयर
10. टकराव टालिए
11. हुआ सो न्याय
12. चिंता
13. क्रोध
14. प्रतिक्रमण (सं, ग्रं)
16. दादा भगवान कौन ?
17. पैसों का व्यवहार (सं, ग्रं)
19. अंत:करण का स्वरूप
20. जगत कर्ता कौन ?
21. त्रिमंत्र
22. भावना से सुधरे जन्मोंजन्म
23. चमत्कार
24. प्रेम
25. समझ से प्राप्त ब्रह्मचर्य (सं, पू, उ)
28. दान
29. मानव धर्म
30. सेवा-परोपकार
31. मृत्यु समय, पहले और पश्चात्
32. निजदोष दर्शन से... निर्दोष
33. पति-पत्नी का दिव्य व्यवहार (सं)
34. क्लेश रहित जीवन
35. गुरु-शिष्य
36. अहिंसा
37. सत्य-असत्य के रहस्य
38. वर्तमान तीर्थंकर श्री सीमंधर स्वामी
39. माता-पिता और बच्चों का व्यवहार (सं)
40. वाणी, व्यवहार में... (सं)
41. कर्म का विज्ञान
42. सहजता
43. आप्तवाणी - 1 से 9
52. आप्तवाणी - 13 (पूर्वार्ध व उत्तरार्ध)
54. आप्तवाणी - 14 (भाग-1, 2)
56. ज्ञानी पुरुष (भाग-1)

**( सं - संक्षिप्त, ग्रं - ग्रंथ, पू - पूर्वार्ध, उ - उत्तरार्ध )**

**★ दादा भगवान फाउन्डेशन द्वारे गुजराती आणि इंग्रजी भाषेत सुद्धा बरीच पुस्तके प्रकाशित झाली आहे। वेबसाइट www.dadabhagwan.org वर सुद्धा आपण ही सगळी पुस्तके प्राप्त करू शकता।**

**★ प्रत्येक महिन्यात हिन्दी, गुजराती आणि अंग्रेजी भाषेत दादावाणी मेगेझीन प्रकाशित करीत आहे।**

## संपर्क सूत्र

### दादा भगवान परिवार


**अडालज** : **त्रिमंदिर**, सीमंधर सिटी, अहमदाबाद-कलोल हाईवे,
पोस्ट : अडालज, जि.-गांधीनगर, गुजरात - 382421
**फोन** : 9328661166, 9328661177
E-mail : info@dadabhagwan.org

**मुंबई** : **त्रिमंदिर,** ऋषिवन, काजुपाडा, बोरिवली (E)
फोन : 9323528901

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **दिल्ली** | : | 9810098564 | **बेंगलूर** | : | 9590979099 |
| **कोलकता** | : | 9830080820 | **हैदराबाद** | : | 9885058771 |
| **चेन्नई** | : | 7200740000 | **पूणे** | : | 7218473468 |
| **जयपुर** | : | 8890357990 | **जलंधर** | : | 9814063043 |
| **भोपाल** | : | 6354602399 | **चंडीगढ** | : | 9780732237 |
| **इन्दौर** | : | 6354602400 | **कानपुर** | : | 9452525981 |
| **रायपुर** | : | 9329644433 | **सांगली** | : | 9423870798 |
| **पटना** | : | 7352723132 | **भुवनेश्वर** | : | 8763073111 |
| **अमरावती** | : | 9422915064 | **वाराणसी** | : | 9795228541 |

**U.S.A.** : **DBVI Tel. :** +1 877-505-DADA (3232),
**Email :** info@us.dadabhagwan.org

**U.K.** : +44 330-111-DADA (3232)

**Kenya** : +254 722 722 063

**UAE** : +971 557316937

**Dubai** : +971 501364530

**Australia** : +61 421127947

**New Zealand** : +64 21 0376434

**Singapore** : +65 81129229


**www.dadabhagwan.org**



## सेवेचे फळ...

जगाचे काम करत राहा, तुमचे काम आपोआप होत राहील. जगाचे काम कराल तेव्हा तुमचे काम आपोआप होत राहील आणि तेव्हा तुम्हालाच आश्चर्य वाटेल.

मनुष्यांने जेव्हापासून दुसऱ्यांना सुख देण्यास सुरुवात केली तेव्हापासूनच धर्माची सुरुवात झाली. स्वत:चे सुख नाही, परंतु समोरच्याची अडचण कशी दूर होईल असेच वाटत राहते, तेव्हापासूनच करुणेची सुरुवात होते. आम्हाला लहानपणापासूनच समोरच्याची अडचण दूर करण्याची तळमळ होती. स्वत:साठी विचारसुद्धा येत नाही, ती करुणा आहे. त्यामुळेच 'ज्ञान' प्रकट होते.

-दादाश्री

dadabhagwan.org

ISBN 978-93-86321-04-6

9 789386 321046

Printed in India

Price ₹10